सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ४ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ८१ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## सहा जवान जखमी

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) वाहनाला अपघात होऊन सहा जवान जखमी झाले. श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील सोनमर्ग (गगनगीर) बोगद्याजवळ हा अपघात घडला. सूत्रांनीदिलेल्या माहितीनुसार, वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते रस्त्यावरून घसरून उलटले. अपघातात वाहनातील सहा सीआरपीएफ जवान जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मदतकार्य सुरू करण्यात आले.जखमी जवानांवर घटनास्थळी प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना गुंड येथील सीआरपीएफ छावणीत तसेच जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.या अपघाताची स्थानिक पोलिसांनी नोंद घेतली असून, नेमके कारण काय होते याचा तपास सुरू करण्यात आला आहे. अपघातामागील कारणांचा शोध घेण्यासाठी संबंधित यंत्रणा सखोल चौकशी करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## पर्यटकांवर निर्बंध ?

नवी मुंबई : सध्या पाऊस जोर धरत असताना पावसाळी दिवसांत निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटनस्थळी निसर्गप्रेमींची गर्दी होताना दिसत आहे. घणसोली येथील गवळीदेव पर्यटनस्थळाचा विकास करण्यात येत असल्याने या ठिकाणी पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे.

# पाकिस्तानात बस दरीत कोसळून ४० ठार




वृत्तसंस्था

इस्लामाबाद : पाकिस्तानात शुक्रवारी सकाळी भीषण अपघात झाला आहे. खैबर पख्तूनख्वाह आणि बलुचिस्तान सीमेच्या जवळ भरधाव वेगातील बस खोल दरीत कोसळली. चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला. त्यात ४० जणांचा मृत्यू झाला असून ८ जण जखमी झाले आहेत. त्यांची प्रकृती गंभीर आहे.

बलुचिस्तान सरकारचे प्रवक्ते शाहिद रिंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, दाना सर परिसरात हा भीषण अपघात झाला. बस महामार्गावरुन भरधाव वेगात जात होती. तितक्यात चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं. यानंतर बस रस्त्यावरुन खाली उतरली आणि खोल दरीत कोसळली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस प्रवाशांनी खच्चून भरली होती. रस्त्यात एक दुसरी बस बंद पडली. बराच वेळ उलटूनही ती सुरू झाली नाही. या नादुरुस्त बसमधील प्रवासीदेखील याच बसमध्ये होते. त्यामुळे बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते. याच कारणामुळे बसला अपघात झाल्याचं प्राथमिक तपासातून समोर आलं आहे. अपघातस्थळी मदत आणि बचाव पथकं पोहोचली आहेत. जखमींचा शोध घेण्याचं काम सुरू आहे.

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारींनी दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला. अपघातामधील मृत प्रवाशांच्या कुटुंबियांबद्दल त्यांनी सहवेदना व्यक्त केल्या. जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनीदेखील अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं. प्रशासनाला मदत आणि बचाव कार्याला वेग देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. जखमींना उत्तम उपचार द्या. त्यात कोणतीही कमतरता ठेवू नका, असे निर्देश बुगती यांनी दिले.

अपघातग्रस्त बस ३६ प्रवाशांसह क्वेटाहून निघाली होती. पण रस्त्यात अन्य एक बस बंद पडली होती. त्या बसमधील प्रवासी याच बसमध्ये चढले. यानंतर बसमध्ये ४८ प्रवासी झाले. अपघातावेळी बसमध्ये क्षमतेहून अधिक प्रवासी होते. अपघातात ४० प्रवाशांचा मृत्यू झाला.

# हिमाचलमध्ये पावसाचा कहर

वृत्तसंस्था

शिमला : हिमाचल प्रदेशात मान्सूनने जोरदार हजेरी लावताच विविध भागांत नैसर्गिक आपत्तींचे संकट गडद झाले आहे. जनजातीय जिल्हा किन्नौरमध्ये चोलिंग परिसरात झालेल्या मुसळधार पावसानंतर अचानक आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यासोबत आलेल्या माती, दगड आणि चिखलामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५ पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद झाला असून अनेक वाहने रस्त्यात अडकली आहेत.

पुराचा वेग इतका प्रचंड होता की महामार्गावरून जाणारी अनेक वाहने चिखल आणि ढिगाऱ्यात अडकून पडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्वजण सुरक्षित आहेत. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने बचाव आणि मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू केले. किन्नौरचे उपायुक्त डॉ. अमित कुमार शर्मा यांनी घटनेची पुष्टी करत महामार्गावरील मलबा हटवण्यासाठी आणि अडकलेली वाहने बाहेर काढण्यासाठी जड यंत्रसामग्री तैनात करण्यात आल्याचे सांगितले. प्रशासनाचे पथक घटनास्थळी कार्यरत असून राष्ट्रीय महामार्ग लवकरात लवकर पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, लाहौल-स्पीती जिल्ह्यातील जाहलमा नाल्यात आलेल्या पुरामुळे पूल पुन्हा एकदा बाधित झाला आहे. सीमारेषा रस्ते संघटनेने (इठज) उभारलेली तात्पुरती पुलियाही पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने उदयपूर उपविभागासह पांगी खोऱ्याचा संपर्क तुटला आहे.या परिस्थितीत उदयपूर उपविभागातील शेनूर गावातील शांती देवी यांना छातीत संसर्ग आणि श्वास घेण्यास त्रास होत असल्याने कुल्लू येथे उपचारासाठी हलविण्यात येत होते. मात्र, रुग्णवाहिका (-ाळींश्ररपलश) जाहलमा नाल्याजवळ पोहोचल्यावर नाला दुथडी भरून वाहत होता.

## अयोध्या प्रकरणी दोषींना कठोर शिक्षा व्हावी - दत्तात्रय होसबळे



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : अयोध्येच्या श्रीराम मंदिरातील दानपेट्यांमधून झालेल्या चोरी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी. तसेच त्यांनी कडक शिक्षा करावी अशी मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केली आहे. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी शुक्रवारी यासंदर्भात व्हिडीओ जारी करत पहिल्यांदाच या विषयावर प्रतिक्रिया दिली आहे.

यासंदर्भात सरकार्यवाह होसबळे म्हणाले की, श्री रामलला मंदिरातील दानपेट्यांमधून झालेली चोरी ही अत्यंत दुर्दैवी घटना असून, त्यामुळे संपूर्ण समाजासह कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धा आणि भावनांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेमुळे सर्वांनाच दुःख झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.त्यांनी सांगितले की, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या विशेष विनंतीनंतर उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. या तपासाच्या निष्कर्षांच्या आधारे कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली असून, चौकशीत दोषी आढळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कठोर शिक्षा मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच त्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, ही अत्यंत निंदनीय घटना अपवाद म्हणूनच पाहिली जावी. मंदिराच्या व्यवस्थापन आणि कार्यपद्धतीतील सर्व त्रुटी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, जेणेकरून अयोध्येतील राम मंदिराबाबत कोट्यवधी रामभक्तांची श्रद्धा आणि विश्र्वास कायम अबाधित राहील.

## पोस्टाची सुविधा

पुणे : ग्राहकांना अधिक सुलभ, सोयीस्कर व दर्जेदार टपाल सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इंडिया पोस्ट, पुणे टपाल विभागामार्फत रिटेल पार्सल पिक-अप सेवा सुरू केली आहे.

या सेवेचे उद्घाटन पोस्टमास्तर जनरल पुणे क्षेत्र प्रीती अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला.या नव्या सुविधेमुळे किरकोळ ग्राहकांना आता पार्सल पाठविण्यासाठी पोस्ट ऑफिसमध्ये येण्याची आवश्यकता नाही. ग्राहकांच्या विनंतीनुसार टपाल विभागाचे कर्मचारी त्यांच्या घर, कार्यालय अथवा व्यावसायिक आस्थापनातून थेट पार्सल स्वीकारतील, त्याची नोंदणी करून देशातील कोणत्याही ठिकाणी सुरक्षित व विश्र्वासार्ह पद्धतीने पाठवतील.







# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महावितरणचे 'स्मार्ट'पाऊल, योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०३ जूलै : राज्यातील दारिद्रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहकांची वीज बिलाच्या त्रासातून कायमची सुटका करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण 'स्मार्ट' पाऊल उचलले आहे.

'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार' म्हणजेच 'स्मार्ट' योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत लातूर परिमंडळातील तब्बल ४ लाख ८६ हजार ४४७ ग्राहक पात्र ठरणार आहेत. विशेष म्हणजे, या योजनेत केंद्र सरकारच्या अनुदानासोबतच राज्यशासनाकडून भरघोस अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने आता सर्वसामान्यांना छतावर सौर ऊर्जा (रूफ टॉप सोलर) यंत्रणा बसविणे अत्यंत सोपे आणि खिशाला परवडणारे झाले आहे.

'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविल्या जाणाऱ्या या सुवर्णसंधीचा लातूर परिमंडलांतर्गत येणाऱ्या बीड, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील पात्र वीजग्राहकांनी त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.



# विविध वृत्त...

## आज डिजिटल पत्रकारिता कार्यशाळेचे लातूरमध्ये आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जुलै : भारतीय पत्रकार संघ, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, दयानंद कला महाविद्यालय आणि आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी डिजिटल पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दयानंद कला महाविद्यालयातील डिजिटल क्लासरूममध्ये सकाळी ११ वाजता होणार असून, सहभागींसाठी सकाळी १०.३० वाजता नोंदणी अनिवार्य आहे.

या कार्यशाळेत 'सैराट', 'फँड्री', 'कासव', 'ट्रिपल सीट', 'अस्तू' आणि 'नीलकंठ मास्तर' यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांशी संबंधित कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. डिजिटल पत्रकारिता, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, कॅमेरा अँगल्स, कॅमेऱ्याची विविध तांत्रिक वैशिष्ट्ये, दर्जेदार व्हिडिओ निर्मिती व सादरीकरण आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत प्राची मुळेची उल्लेखनीय कामगिरी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ जुलै : मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत जि. प. प्राथमिक शाळा भोजराजनगर, ता. शिरूर अनंतपाळ येथील इयत्ता चौथीची विद्यार्थिनी प्राची सुनील मुळे (रा. दैठणा) हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्राचीने केंद्रस्तर व तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्यात ३९ वा, तर संपूर्ण राज्यात ४५ वा क्रमांक मिळवून शाळा, गाव व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

या यशाबद्दल जि. प. प्राथमिक शाळा भोजराजनगरच्या वतीने विद्यार्थिनी प्राची मुळे हिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. तिच्या या यशामागे मुख्याध्यापक श्री. परमेश्र्वर तोंडारे, शिक्षक उंबरगे सर, सांगवे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन व परिश्रम लाभल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना पहिल्याच बैठकीत आकराशे अर्जांना मंजूरी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३ जुलै : रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार २ जुलै रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्याच बैठकीत तब्बल ११४६ अर्जांना मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आली आहे. दीड महिन्यापूर्वी गठीत झालेल्या या समितीस तातडीने बैठक घेऊन गोरगरीब, सर्वसामान्य गरजू लाभधारकांना, निराधारासह विधवा, अपंगांना लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली होती. सदरील सूचनेनुसार २ जुलै रोजी रेणापूर तहसील कार्यालयात समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत १३८४ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी ११४६ अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २३८ अर्ज नामंजूर करण्यात आले. प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात यांनी समिती अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले. तर समितीच्या वतीने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्याचा सत्कार केला.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष सतीष रावसाहेब आंबेकर, सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात, सहा. गोविंद काळे, समिती सदस्य ललीता कांबळे, कस्तुराबाई माने, विठ्ठल कसपटे, संजय चव्हाण, गोविंदराव देशमुख, सदानंद पिंपळे, विरेन्द्रसिंह चौहान, सतिश जाधव, सुरेश बुड्डे यांच्यासह महसूल सहाय्यक गुलाब काळे, तुकाराम जाधव माहिती तंत्रज्ञान सहाय्यक विठ्ठल राठोडे आदी होते.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जुलै : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ४ जुलै, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ जुलै, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही.

कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

## नि:स्वार्थ सेवाकार्याची राज्यस्तरीय दखल उषाताई मिठाराम राठोड यांना 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार'

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ३ जुलै : शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ प्रामाणिकपणे कार्य करत सामाजिक बांधिलकी जपत गरीब, गरजू व वंचित घटकांसाठी निःस्वार्थ भावनेने सेवा करणाऱ्या रेणापूर येथील सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती उपाताई मिठाराम राठोड यांना महाराष्ट्र पोलिस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने प्रदान करण्यात येणारा राज्यस्तरीय 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार' बहाल करण्यात आला. हा पुरस्कार शनिवारी आयोजित भव्य व प्रतिष्ठित सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



पुरस्कार वितरण सोहळ्यास शिक्षक आ. विक्रम काळे, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, सिनेअभिनेत्री मेघाली वाघ तसेच सुफी सय्यद शमशोद्दीन यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षण, समाजसेवा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत श्रीमती राठोड यांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्रीमती राठोड यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जपणूक करताना सामाजिक उत्तरदायित्वही प्रभावीपणे पार पाडले आहे. गरजू कुटुंबांना मदतीचा हात, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि समाजहितासाठी सातत्याने केलेले कार्य यामुळे त्यांना परिसरात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

या राज्यस्तरीय सन्मानामुळे रेणापूर तालुक्याच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राचा गौरव वाढला असून, विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीमती उपाताई मिठाराम राठोड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या पुढील समाज उपपयोगी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या

## मराठा सेवा संघातर्फे ६ जुलै रोजी गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा व करिअर मार्गदर्शन शिबीर...

निलंगा :- प्रतिवर्षाप्रमाणे मराठा सेवा संघ, निलंगा यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी ठरलेल्या उमेदवारांचा तसेच क्रीडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम सोमवार, दि. ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता जिजाऊ सृष्टी, निलंगा येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा न्यायाधीश व्यंकटराव कदम हे राहणार असून गटविकास अधिकारी सतीश पाटील आणि उद्योजक तथा क्रेडाई लातूरचे अध्यक्ष उदय पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.

कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी एन. आर. शिंदे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष रोहन जाधव, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, गटशिक्षणाधिकारी चंद्रहास म्हेत्रे, युवा उद्योजक रामभाऊ क्षिरसागर,मिथुन दिवे व सदाशिव लोभे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी गुणवंत विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांतील यशस्वी उमेदवार आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

मराठा सेवा संघ व सेवासंघांतर्गत सर्व कक्षांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ शाखेच्या आयोजकांनी केले आहे.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणा विरोधात निलंग्यात एल्गार.. संविधानाशी छेडछाड खपवून घेणार नाही लातूरच्या महामोर्चासाठी जोरदार रणशिंग..



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ जुलै : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, निलंगा यांच्या वतीने शासकीय विश्रामगृह, निलंगा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तसेच ६ जुलै रोजी लातूर येथे होणारा जिल्हास्तरीय महामोर्चा अभूतपूर्व करण्याचा निर्धार करण्यात आला.

बैठकीत उपस्थित विविध समाज घटकांच्या प्रतिनिधींनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कोणताही आघात सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत, संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना धक्का पोहोचेल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाच्या दिशेने कोणतीही घाईगडबडीची पावले उचलू नयेत, संबंधित समाजघटकांशी व्यापक चर्चा करावी आणि निर्माण झालेला संभ्रम दूर करावा, अशी ठाम मागणी बैठकीत करण्यात आली.

बैठकीत निलंगा शहर व तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने महिला, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी लातूरच्या महामोर्चात सहभागी व्हावे, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक भागातून वाहनांची व्यवस्था करून हजारोंच्या संख्येने नागरिकांना मोर्चात सहभागी करण्यासाठी नियोजन आखण्यात आले.

उपस्थितांनी संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या संरक्षणासाठी लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने समाजात मतभेद निर्माण करणाऱ्या निर्णयांऐवजी विश्र्वास, संवाद आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारी भूमिका स्वीकारावी, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

बैठकीस विलास सूर्यवंशी, अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, दाजीबा कांबळे, अर्जुनाप्पा कटके (ढोर समाज), काशिनाथ जाधव (चर्मकार समाज), शरद पेठकर (माळी समाज), धम्मानंद काळे, प्रकाश गायकवाड, प्रकाश कांबळे, दिगंबर सूर्यवंशी, देवदत्त सूर्यवंशी, अनंत कांबळे, बंटी कांबळे, शुभम सूर्यवंशी, राहुल मोरे, गजानन सूर्यवंशी, सलीम पठाण, मोहन सूर्यवंशी यांच्यासह विविध समाजघटकांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केशवराज शैक्षणिक संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जुलैः अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज शैक्षणिक संकुलात रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी,१० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थी, छ्चचड परीक्षा, क्रीडा, कला क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक उंचावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या कष्ट,जिद्द, चिकाटी आणि पालकांच्या त्यागाला मानाचा मुजरा करणारा हा सोहळा केवळ सत्काराचा कार्यक्रम नसून, नव्या पिढीच्या स्वप्नांना प्रेरणा देणारा आणि गुणवत्तेच्या परंपरेला नवी दिशा देणारा प्रेरणोत्सव ठरणार आहे.या भव्य कार्यक्रमाचे आयोजन तीन स्वतंत्र सत्रांत करण्यात आले असून प्रत्येक सत्रात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत गौरव करण्यात येणार आहे.

सकाळी शाळा परिसरात होणाऱ्या पहिल्या सत्रात छ्चचड शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून उद्धव फड यांची उपस्थिती लाभणार आहे.

यानंतर सकाळी ११.०० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे दुसरे सत्र संपन्न होईल. या सत्रात इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ सभासद डॉ.राम पाटील (अंबाजोगाई) राहतील. प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी तसेच लातूर जिल्हा परिषदेतील गटनेते रामचंद्र तिरुके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सायंकाळी ५.०० वाजता दयानंद सभागृहात होणाऱ्या तिसऱ्या आणि मुख्य सत्रात दहावी बोर्ड परीक्षेत ९५ ते १०० टक्के गुण प्राप्त विद्यार्थी, बारावी बोर्ड परीक्षा, उएढ परीक्षा तसेच राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख राहतील. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे,लातूर जिल्ह्याच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा केशवराज विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती शिल्पाताई करमरकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव आणि केंद्रीय विद्यासभेचे संयोजक महेश कस्तुरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने गेल्या अनेक दशकांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाची समृद्ध परंपरा जपली आहे. या परंपरेतून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करीत असून, त्यांच्याच गौरवासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा विद्यार्थ्यांच्या यशाला समाजाचा सन्मान देणारा आणि भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या त्रिसत्रीय गुणगौरव सोहळ्यास लातूर शहर व जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी नागरिक, पालक, माजी विद्यार्थी व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद सामायिक करावा आणि भारतीय शिक्षण प्रसारक संस्था तसेच श्री केशवराज शैक्षणिक संकुलावरील आपला स्नेह अधिक दृढ करावा, असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख,जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष (माध्यमिक विभाग) गंगाधर खेडकर, शालेय समिती अध्यक्ष (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) प्रा.श्रीकृष्ण जाधव, शालेय समिती अध्यक्षा (केशव शिशु वाटिका) सौ. वर्षाताई डोईफोडे,मुख्याध्यापक (माध्यमिक) शैलेंद्र कंगळे, उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,प्राचार्या (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) श्रीमती सोनाली दर्डा, मुख्याध्यापक (प्राथमिक) शिवाजी हेंडगे,शिशु वाटिका प्रधानाचार्या सौ.अवंती कुलकर्णी, समन्वयक गुरूनाथ झुंजारे यांनी केले आहे.


जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय

(दंडीय - विभाग) जा. क्र.२०२६एमएजी/कावि-

ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात जन्म / मृत्यु नोंदणी बाबत.

श्री. मधुकर नामदेव माने विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हिप्पळगाव ज्याअर्थी नामे. पल्लवी मधुकर माने रा. हिप्पळगाव ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/नाताचा/नातीचा जन्म दि. १०/०७/१९९९ मौजे. हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार मधुकर नामदेव माने रा. हिप्पळगाव यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे पल्लवी मधुकर माने रा. हिप्पळगाव ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १०/०७/१९९९ रा. हिप्पळगाव रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे पल्लवी मधुकर माने रा. हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल. पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरीत

तहसिलदार तथा

तालुका कार्यकारी दंडाधिकारी

शिरूर अनंतपाळ

## संक्षिप्त...

### मंगेशकर महाविद्यालयात ए यू स्मॉल फायनान्स बँकेच्या कॅम्पस मुलाखती संपन्न

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ जुलै : तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट कक्षाच्या वतीने महाविद्यालयात दि.१ रोजी ए यू स्मॉल फायनान्स बँकेच्या कॅम्पस मुलाखती संपन्न झाल्या. महाविद्यालयातील एकूण २२ विद्यार्थ्यांनी सदर मुलाखत दिली. यावेळी पायल तलेसरा (ऑपरेशनल मॅनेजर, हैदराबाद) व शिवम सिंग (एच.आर., मुंबई) यांनी विद्यार्थ्यांना ए यू स्मॉल फायनान्स बँकेबाबत सविस्तर माहिती देऊन अनुषंगिक लेखी परीक्षा व मुलाखत घेतली. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांच्या मार्गदर्शनात करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक डॉ.रितेश व्यास, डॉ.विनोद चिंते यांनी प्रस्तुत कॅम्पस मुलाखतीच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. याप्रसंगी डॉ.सचिन हंचाटे, प्रो.मोहन बंडे, डॉ.प्रदीप पाटील, प्रा.आकांक्षा मुळे, प्रा.श्रीकांत ढेबे, विलासराव होटकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मुलाखत दिलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी 'महाविद्यालयात संपन्न कॅम्पस मुलाखतीमुळे आम्हाला मुलाखत देण्याचा एक चांगला अनुभव आला असून यासोबतच ए यू स्मॉल फायनान्स बँकेविषयी सविस्तर माहिती मिळाल्याने आमच्या ज्ञानात मोलाची भर पडली आहे. याबद्दल आम्ही महाविद्यालयाचे आभारी आहोत' अशा प्रतिक्रिया नोंदविल्या.

## शिरूर अनंतपाळ पोलीसांची मोठी कारवाई; ११ लाख ७८ हजाराचा प्रतिबंधीत गुटक्यासह वाहन जप्त



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ जुलै : शिरूर अनंतपाळ पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री तळेगाव (दे.) परिसरात कारवाई करत सुमारे ११ लाख ७८ हजार १०० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला, जर्दा व वाहन जप्त करण्यात पो हे का गौतम घाडगे व पोलीस कर्मचारी संदीप साठे यांना गाडी तपासणी दरम्यान प्रतिबंधीत गुटखा व पान मसला आढळून आल्यामुळे तो माल व गाडी जप्त करून. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २ जुलै रोजी रात्री १२ . ३० वाजण्याच्या सुमारास तळेगाव (दे.) येथे एम एच- २४ ए एस- ४६२८ क्रमांकाच्या सिल्व्हर रंगाच्या सुझुकी एर्टिगा कारची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आला.

या कारवाईत २ लाख ८३ हजार ९२० रुपयांचा विमल पान मसाला, १ लाख २१ हजार ६८० रुपयांचा व्ही -१ पान मसाला, २२ हजार ५०० रुपयांचा यू.के. जाफरानी जर्दा तसेच ७ लाख ५० हजार रुपये किमतीची एर्टिगा कार असा एकूण ११ लाख ७८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सय्यद मोजम आजम व इब्राहीम तांबोळी (रा. अहमदपूर, जि. लातूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ५९ अन्वये शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कार्यवाही पोहेका गौतम घाडगे व पोलीस कर्मचारी संदीप साठे यांनी केली .

पोलीस हवालदार गौतम दशरथ घाडगे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलीस निरीक्षक भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रायबोळे पुढील तपास करत आहेत.यावेळी पिएसआय रायबोळे, घाडगे, साठे,अर्जुने, शिंदे,नलवाड,पाटील उपस्थित होते.

### लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ जुलै : 'पीएम यशस्वी' अंतर्गत 'टॉप क्लास एज्युकेशन इन स्कूल फॉर ओबीसी, ईबीसी अँड डीएनटी स्टुडंट्स' या योजनेची शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये लातूर जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आपले अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देण्यात आली आहे.

या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील नामांकित (टॉप क्लास) शाळा किंवा कॉलेजमध्ये इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिकणारे आणि इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागासलेले तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, असे सर्व विद्यार्थी पात्र ठरणार आहेत. या कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्ह्यातील सर्व संबंधित शाळा आणि महाविद्यालयांनी तात्काळ पुढाकार घेऊन आपल्या संस्थेतील १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत नॅशनल पोर्टलवर भरून घ्यावेत, एकही पात्र विद्यार्थी या शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय प्र. अटकळ यांनी केले आहे.

### नवउद्योजकांनी ३१ जुलै पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.३जुलैः केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील घटकांसाठी 'मार्जिन मनी योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील इच्छूक नवउद्योजक लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव ३१ जुलै २०२६ पूर्वी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

### रोटरी क्लबच्या वतीने 'डॉक्टर डे ' व कृषि दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि.३ जुलै : येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, इनरव्हील क्लब, साई हॉस्पिटल व इमा व निमा संघटनेच्या वतीने 'डॉक्टर डे ' व कृषि दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील डॉक्टरांचा व शेतकरी बंधुचा सत्कार करण्यात आला. तसेच या निमित्ताने डॉ. चंबुले यांच्या अवलकोंडा रोड वरील नियोजित हॉस्पिटल परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी डॉ. माधव चंबुले, रोटरी क्लबचे अध्यक्ष अ‍ॅड. विक्रम संकाये, उपाध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव डॉ. सुधीर जाधव, कोषाध्यक्ष निशांत धवलशंख, रामेश्र्वर निटुरे,प्रशांत मांगूळकर, संतोष फुलारी, महानंदा सोनटक्के, सरस्वती चौधरी, ज्योती चौधरी, विशाल जैन,विक्रम हलकीकर, रामभाऊ सोनटक्के, अजय अंबेसंगे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ. सविता पदातुरे, मीरा चंबुले, मानसी चन्नावार, पल्लवी मुक्कावार यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. महेश जाधव, डॉ. शैलेश येरोळकर, डॉ. महेश आजने यांच्यासह अन्य डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विशाल जैन यांनी केले. आभार ऍड. विक्रम संकाये यांनी मानले.

### साक्षी जाधव हिचा विद्यावर्धिनी हायस्कूल तर्फे सत्कार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि.३ जुलै : येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित विद्या वर्धिनी हायस्कूल उदगीर येथील विद्यार्थिनी कु. साक्षी शरद जाधव यांनी एस.एस.सी बोर्ड परीक्षा ९९.२०%गुण घेऊन घवघवीत यश संपादन करून शाळेचे व आई -वडिलांचे नावलौकिक केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने साक्षी जाधव या विद्यार्थिनीचा महाराष्ट्रातील एकीकरण समिती सचिव पृथ्वीराज पाटील एकंबेकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पि.टी शिंदे, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, सदस्य पुंडलिकराव पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक राम ढगे, उप मुख्याध्यापक बी.व्ही बिरादार, साक्षीचे आजी पुतळाबाई जाधव,आई कल्पना जाधव, वडील शरद जाधव, पर्यवेक्षक राजेंद्र वलाकटे, संदीप बांगे,परीक्षा विभाग प्रमुख बाबासाहेब पाटील, शिक्षक प्रतिनिधी बंडू पाटील लोणीकर,सोनाली पाटील यांच्यासह विद्यार्थी, पालक ,शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. साक्षीच्या या उत्तुंग यशाबद्दल मित्र परिवारासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## लातूरला विभागीय आयुक्तालय द्या विधानसभेत आमदार अभिमन्यू पवार यांची मागणी




तभा वृत्तसेवा

औसा दि.३ जुलै : लातूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील तसेच अस्मितेचा विषय असलेल्या लातूर विभागीय आयुक्तालयाचा प्रश्न शासनाने तातडीने निकाली काढावा. आणि लातूरला स्वतंत्र विभागीय आयुक्तालय मंजूर करावे, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करून केली.

सभागृहात बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, लातूर विभागीय आयुक्तालयाचा विषय १९८५ पासून प्रलंबित असून आजही लातूर व धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना अगदी किरकोळ शासकीय कामांसाठीही ३०० ते ३५० किलोमीटरचा प्रवास करून छत्रपती संभाजीनगर येथे जावे लागते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी, रेशन दुकानदार तसेच विविध विभागांशी संबंधित व्यक्तींची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी लातूर येथे विभागीय आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी नांदेडचा पर्याय जाहीर केल्याने हा प्रश्न अधिकच प्रलंबित राहिला. मात्र या काळात लातूरमध्ये विविध विभागांची २५ हून अधिक विभागीय कार्यालये स्थापन झाली असून प्रशासकीय सुविधा, भौगोलिक स्थान आणि नैसर्गिक न्यायाच्या निकषांवर लातूर येथे स्वतंत्र विभागीय मुख्यालय होण्यासाठी पूर्णपणे पात्र आहे.

आमदार पवार पुढे म्हणाले, तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर स्थगिती देत विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दांगड समितीची नियुक्ती केली होती. समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला असून तो तातडीने स्वीकारून लातूर विभागीय आयुक्तालयाबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी आ.पवार यांनी यावेळी केली.

लातूरच्या जनतेसाठी हा केवळ प्रशासकीय प्रश्न नाही, तर अस्मितेचा विषय आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आता अधिक काळ रखडवू नये. शासनाने त्वरित निर्णय घेऊन लातूरला विभागीय आयुक्तालयाचा दर्जा द्यावा आणि जनतेला न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी विधानसभेत केले.

### शिक्षिका पुष्पा शेळके यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा सपन्न



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ३ जुलै : येथील श्रीराम प्राथमिक विद्यामंदिराच्या आदर्श शिक्षिका पुष्पा शेषराव शेळके या नियत वयोमाना नुसार ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी तब्बल ३६ वर्षे अध्यापन क्षेत्रात कार्य करत हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले.

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, समाजसेवा आणि देशसेवेची भावना रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल आयोजित सेवापूर्ती सन्मान सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड होते. त्यांनी शेळके यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव ड. पंडितराव उगीले यांनीही त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला. यावेळी उपाध्यक्ष रविकांत आकनगीरे, संचालक अनिता भतीकरे, ड. दीपक गोडभरले, प्राचार्य अनिल कुटवाड, मुख्याध्यापिका चंचला वळसे, पर्यवेक्षक प्रा. जुबेरखान पठाण, गणेश नरळे, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीप्रसाद उगीले यांनी केले, तर आभार प्रा. लहुकांत शेवाळे यांनी मानले.

### राज्यातंर्गत पीक स्पर्धे करिता अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०३ जुलै : राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देवून गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यातंर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

## जुलै उजाडला तरी शेत शिवार कोरडेच

### पावसाअभावी पेरणी रखडली शेतकरी बांधावरच जेवून पुन्हा



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ जुलै : तालुक्यातील भर पावसाळ्याचा जुलै महिना उजाडला तरी शिरूर अनंतपाळ तालुक्यात पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. आभाळात ढग दाटतात, पण बरसत नाहीत. अशा स्थितीतही शेतकरी शेत तयार करण्याचे काबाडकष्ट करत आहेत.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ शिवारात आज दुपारी १ वाजता ५६ वर्षीय शेतकरी ओमप्रकाश तांबोळकर हे आपल्या शेतातील बाभळीच्या झाडाखाली जेवायला बसलेले दिसले. शेतात राबून थकलेला बळीराजा जेवायला बसलाय खरा परंतु आकाशाकडे लागलेल्या डोळ्यामुळे त्याचा घास घशाखाली उतरत नाहीये शेतीचे नियोजन कोलमडल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.ओमप्रकाश तांबोळकर हे सकाळी ५ वाजल्यापासून शेतातील काडीकचरा,पालापाचोळा गोळा करत होते. अंगातून घामाच्या धारा, कपडे मातीने माखलेले, आणि चेहऱ्यावर थकवा स्पष्ट दिसत होता.

घरुन निघतांना कारभारणीने डब्यात ज्वारीची दोन भाकरी, लसणाची चटणी आणि कांदा. बाजूला पाण्याचा गडवा. १० मिनिटांत जेवण उरकून ते पुन्हा शेतात उतरले.

जुलैचा पहिला आठवडा सुरू झाला . अजून पेरणी योग्य पाऊस नाही. पण पाऊस आला की एकही दिवस वाया घालवायचा नाही म्हणून नांगरणी करून मशागत करून ठेवतोय. घरी जायला वेळ नाही. इथंच दोन घास खातो आणि पुन्हा कामाला सुरुवात करतो असे ओमप्रकाश तांबोळकर सांगतात.

कृषी उत्पन्न बाजार समितीत बियाणे, खतांची खरेदी झाली आहे, पण शेतकरी पेरणीच्या प्रतीक्षेत आहेत. मजूर टंचाईमुळे अनेक शेतकरी स्वतःच दिवसभर शेतात राबत आहेत. दुपारचे जेवणही बांधावरच उरकावे लागत आहे.

हवामान खात्याने पुढील ३/४ दिवसांत हलक्या सरींचा अंदाज वर्तवला असला तरी पेरणीयोग्य जोरदार पाऊस कधी होणार याची शाश्र्वती नाही.

जून महिना कोरडा गेला जुलै महिन्यात पाऊस नसल्याने उत्पादन घटण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. तरीही ओमप्रकाश तांबोळकरसारखा बळीराजा आशा सोडायला तयार नाही.

## जि.प. प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३ जुलै : शहरातील जिल्हा परिषद प्रशाला( मुलांची) निलंगा या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम शासकीय विश्रामगृहात उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी व परभणी येथील पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असलेले विलास गोबाडे, रियल इस्टेट गुंतवणूकदार व गुत्तेदार अंकुशराव ढेरे हा कार्यक्रम आयोजित केलेले सराफ व्यापारी रामचंद्र उर्फ दिपक नाईक, गणेश राईस वर्ल्डचे मालक उद्योजक संतोष सोरडे इत्यादी सह अनेक माजी विद्यार्थी या स्नेहसंमेलनाला उपस्थित होते.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक विलास गोबाडे म्हणाले की सन १९९२/९३ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी जि प प्रशाला मुलांची निलंगा या आपल्या शाळेचे नाव जिल्हाभरात लौकिक केले होते. त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी आपल्या गुरुजन वर्गाचा मानसन्मान ठेवून तसेच आपल्या आई-वडिलांच्या आज्ञा चे पालन करून शिक्षण घेत होते असे सांगून जुन्या आठवणींना उजाळा दिला . आजच्या घडीचे शिक्षण व पूर्वीच्या शिक्षणाची पद्धत वेगळी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

त्या काळातील अनेक विद्यार्थी गरीब वंचित असून सुद्धा आपल्या शाळेचे नावलौकीक करण्याचे स्वप्न विद्यार्थी पाहत होते. मात्र आताचे शिक्षण हे गरिबांना न परवडणारे असून राज्यात शिक्षणाचे संपूर्ण बाजारीकरण झाल्याचे त्यांनी या वेळेस बोलताना सांगितले.

एकीकडे गरिबीशी झुंज देत आपण आपल्या शाळेची ही नाव लौकिक करून आपण सर्वांनी एक वेगळा ठसा निर्माण केल्याचे अंकुशराव ढेरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

ते म्हणाली की आपण गेल्या चाळीस वर्षापासून वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यरत असल्यामुळे आपला संपर्क होऊ शकला नसल्यामुळे त्यांनी खंत व्यक्त केले. आज आपण आपल्या जिल्हा परिषद प्रशाला मुलांची निलंगा या शाळेतील सर्व माजी विद्यार्थी एकत्र येण्याचा योगायोग असून मला आज आपण एकत्र आल्याचे पाहून खूप गर्व व अभिमान वाटतो असे ते म्हणाले. अनेक माजी विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेवर उद्योग, नौकरी ,व्यापार अशा अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करत असल्याचे पाहून सर्वांचा खूप अभिमान वाटतो असे अंकुश ढेरे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला पीएसआय विलास गोबाडे, गणेश राईस वर्ल्डचे उद्योजक संतोष सोरडे, राम जानकी ज्वेलर्स चे मालक रामचंद्र उर्फ दीपक नाईक, समद सितारी, माधव आर्य, गुत्तेदार राजकुमार चिक्राळे, माधव वाडीकर, महावितरण चे लक्ष्मण जाधव, सराफ व्यापारी अखिल सय्यद, उल्हास वाघमोडे, सुधीर देशमुख, सराव व्यापारी मेहमूद झरेकर यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. खूप वर्षानंतर एकत्र आल्यामुळे प्रत्येकानी आपुलकीने विचारपूस करून व आपण यशस्वी कसे झालो याचे प्रत्येकाने आपल्या मनोगतातून भावना व्यक्त केल्या.

### हरितक्रांतीचे शिल्पकार कै. वसंतरावजी नाईक यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

रेणापुर येथील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर, रेणापूर (ता. रेणापूर, जि. लातूर) येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे शिल्पकार कै. वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य . प्रदीप राठोड यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.यावेळी विद्यार्थ्यांना कै. वसंतरावजी नाईक यांच्या कार्याचा व कृषी क्षेत्रातील योगदानाचा परिचय करून देण्यात आला. जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच वक्तृत्व, निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व विचारक्षमतेला प्रोत्साहन देण्यात आले.कार्यक्रमास प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक . लव्हेकर सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह, शिस्त व प्रेरणादायी वातावरणात कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## अग्रलेख

# चावडीवरच्या रिकाम्या खुर्च्या...

भारतीय लोकशाहीबद्दल चर्चा करताना संसद, राज्यांची विधिमंडळे आणि झालेच तर महापालिकांच्या आमसभा यावरच बोलले जाते. त्यांच्याच बातम्या होतात आणि त्यावरच चर्वणही. लोकतांत्रिक व्यवस्थेच्या अधिष्ठानी असलेल्या ग्रामसभा या अत्यंत महत्त्वाच्या घटकाबद्दल कधीच बोलले जात नाही. क्वचित ग्रामसभेत काही गडबड झाली तर त्याची बातमी येते एवढेच. बाकी आपल्या व्यवस्थेला ग्रामसभांशी देणेघेणे नाही आणि आता तर ग्रामसभेतील चर्चेशी ज्यांच्या जगण्याचा संबंध आहे, त्या ग्रामस्थांकडूनही त्याकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष केले जाते. भारत सरकारच्या ताज्या अहवालाने हा विषय चव्हाट्यावर आणला आहे. महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला घटनात्मक अधिष्ठान देण्याचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे ७३ वी घटनादुरुस्ती. या दुरुस्तीद्वारे पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला आणि ग्रामसभेला स्थानिक स्वराज्य व्यवस्थेचा मूलाधार म्हणून राज्यघटनेत स्थान देण्यात आले. संसद किंवा राज्याचे विधिमंडळ पाच वर्षांतून एकदा मत मागते. ग्रामसभा मात्र वर्षातून अनेक वेळा थेट नागरिकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देते, हे याचे खरे वैशिष्ट्य. उपजीविकेची चिंता, व्यवसाय व नोकरीचा ताण, सहभागाचा कंटाळा, पारदर्शकतेचा व विश्वासार्हतेचा अभाव, राजकीय हस्तक्षेप आणि तक्रार निवारण व्यवस्थेतील त्रुटी या कारणांमुळे ग्रामीण भारतातील मोठा वर्ग ग्रामसभेपासून दूर जात असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ४५ टक्के नागरिकांनी पारदर्शकतेचा अभाव हा प्रमुख मुद्दा असल्याचे स्पष्ट केले आहे. लोकशाहीच्या दृष्टीने हे सारे चिंताजनकच म्हटले पाहिजे.

भारतीय ग्रामीण समाजात गेल्या तीन दशकांत प्रचंड बदल झाले आहेत. पूर्वी गाव हीच गावातल्या माणसांची दुनिया होती. आज परिस्थिती बदलली आहे. रोजगाराचे स्वरूप बदलले आहे. हजारो-लाखो तरुण दररोज तालुक्याला, जिल्ह्याला किंवा शहरात कामासाठी जातात. अशा परिस्थितीत कामाच्या वेळेत बोलावलेल्या ग्रामसभेला उपस्थित राहणे त्यांच्या दृष्टीने व्यवहार्य नसतेच. मजुरांचेही तेच. दिवसाची मजुरी गमावणे म्हणजे एका दिवसाचे उत्पन्न गमावणे. पोट आणि लोकशाही यांच्यापैकी एकाची निवड करावी लागते, तेव्हा बहुतांश लोक पोटाची निवड करतात, हे वास्तव नाकारता येत नाही. लोकतांत्रिक यंत्रणेतील नियमित सहभागासाठी वेळ, माहिती, विश्वास आणि उपयोगिता या गोष्टी आवश्यक असतात. यातले काहीच होत नसेल तर कोण कशाला जाईल? 'सहभागाचा कंटाळा' हे वर्णन वरकरणी साधे वाटते. पण त्यामागे मोठे सामाजिक मानसशास्त्र आहे. लोक ग्रामसभेला का येत नाहीत?... कारण त्यांना असे वाटते की त्यांच्या उपस्थितीने काहीही बदलणार नाही. निर्णय आधीच ठरलेले असतात. चर्चा ही औपचारिकता असते. प्रश्न विचारले तर उत्तरे मिळत नाहीत. सूचनांची नोंद होत नाही. अशा अनुभवांची पुनरावृत्ती होते तेव्हा नागरिकांच्या मनात उदासीनता निर्माण होते. पुढे ही उदासीनता सवय बनते आणि शेवटी मानसिक दुरावा निर्माण होतो. राजकीय हस्तक्षेप हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. ग्रामसभा ही पक्षनिरपेक्ष लोकशाहीचे व्यासपीठ असावे. पण अनेक ठिकाणी ती स्थानिक गटबाजीचे रणांगण बनते. त्यामुळे सामान्य नागरिक या वातावरणापासून दूर राहणे पसंत करतो. आणखी एक समस्या म्हणजे तक्रार निवारणाची अपुरी व्यवस्था. ग्रामसभेत प्रश्न उपस्थित केला तरी त्यावर कोणती कारवाई झाली, याचा मागोवा घेण्याची परिणामकारक यंत्रणा बहुसंख्य ठिकाणी नाही. आपल्या मताचा काहीच परिणाम होत नसेल तर दूर राहिलेले बरे, असे नागरिकांना वाटत असेल तर ते चुकीचे म्हणता येणार नाही.

ग्रामसभा ही कायद्याने निर्माण केलेली संस्था. पण तिचे यश कायद्यावर नव्हे, तर लोकांच्या सहभागावर आणि विश्वासावर अवलंबून असते. कायद्याने प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्रामसभा घेणे बंधनकारक करता येते, उपस्थितीची सूचना देता येते, कार्यसूची निश्चित करता येते; परंतु लोकांच्या मनात ग्रामसभेबद्दल आदर, आपलेपणा आणि परिणामकारकतेची भावना निर्माण करता येत नाही. ती निर्माण करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतात. ते प्रयत्न होत नसतील तर असेच होणार. ग्रामीण प्रशासनात कोणतीही माहिती काही मोजक्या लोकांपुरती मर्यादित राहते. नोटीस वेळेवर दिली जात नाही. अजेंडा आधी उपलब्ध नसतो. त्यामुळे नागरिक तयारी करू शकत नाहीत. आर्थिक हिशेब सामान्यांना कळत नाहीत. लोकांना व्यवस्थित माहिती मिळाली, तर ते प्रश्न विचारतात आणि प्रश्न विचारले, तर उत्तरदायित्व वाढते. म्हणूनच माहिती लपविली जाते. पण, या लपवाछपवीतून देशाच्या लोकतांत्रिक व्यवस्थेलाच नख लागत असते. गेल्या काही दशकांत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आलेल्या आरक्षणामुळे मोठी क्रांती घडली. हजारो महिला सरपंच झाल्या, सदस्य झाल्या. परंतु प्रतिनिधित्व आणि प्रभाव यांत मोठी दरी कायम आहे. काही ठिकाणी महिला फक्त सही करण्यापुरत्या उपस्थित राहतात. भारत हा तरुणांचा देश आहे. पण ग्रामसभेतील उपस्थिती पाहिली, तर तरुण सर्वांत कमी दिसतात. आजचा युवक डिजिटल जगात जगतो. त्याला वेग हवा असतो, त्वरित प्रतिसाद हवा असतो, ऑनलाईन माहिती हवी असते. त्याच्या अपेक्षांच्या तुलनेत ग्रामसभा संथ आणि औपचारिक असते. त्यामुळे भविष्यात ग्रामसभेची संकल्पना बदलावी लागेल. बैठकीचे थेट प्रक्षेपण, मोबाईलवर अजेंडा, ऑनलाईन सूचना, निर्णयांचा डिजिटल मागोवा, विकासकामांची जिओ-टॅग माहिती, सामाजिक लेखापरीक्षणाचे खुले डॅशबोर्ड यांसारख्या उपायांनी युवकांचा सहभाग वाढू शकतो. ग्रामसभा सक्रिय असेल तरच खरे लोकाभिमुख परिवर्तन शक्य असते. ज्या गावांमध्ये ग्रामसभा नियमित, पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने होतात, तेथे मोठा विकास झाला. तेथे निधीचा वापर अधिक परिणामकारक होतो. भ्रष्टाचारावर सामाजिक नियंत्रण राहते. याउलट ग्रामसभा निष्क्रिय असलेल्या गावांत निर्णय काही मोजक्या व्यक्तींच्या हातात केंद्रित राहतात. जगातील अनेक देशांनी सहभागी लोकशाहीचे यशस्वी प्रयोग केले आहेत. काही शहरांमध्ये नागरिक थेट अर्थसंकल्पातील काही भागाच्या वापराबद्दल निर्णय घेतात. काही देशांत प्रत्येक निर्णयाचे डिजिटल प्रकटन अनिवार्य आहे. भारतातही ही क्षमता आहे. आपल्या गावांत ज्ञान आहे, अनुभव आहे, सामाजिक भांडवल आहे. कमतरता आहे ती संवादाच्या गुणवत्तेची आणि संस्थात्मक विश्वासाची. ग्रामसभा जिवंत झाली तर पंचायत सक्षम होईल. पंचायत सक्षम झाली, तर जिल्हा मजबूत होईल. जिल्हे मजबूत झाले, तर देशाची लोकशाही अधिक सुदृढ होईल. त्यामुळेच ग्रामसभेतील रिकाम्या खुर्च्यांकडे केवळ उपस्थितीचा प्रश्न म्हणून नव्हे तर लोकशाहीच्या तब्येतीचा निर्देशांक म्हणून पाहिले पाहिजे. आपण विकसित भारताचे स्वप्न पाहत आहोत. पण या विकासाचा पाया शेवटी गावातच आहे. गावातील नागरिक निर्णय प्रक्रियेतून दूर गेला तर विकासाची इमारत उभी राहील; पण तिचा पाया कमकुवत राहील. ग्रामसभेतील सहभाग हा लोकशाहीच्या संस्कृतीचा आणि मूळ आत्मभानाचा विषय आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला; परंतु ग्रामसभेने त्याला शासनात प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार दिला आहे. मतदार हा पाच वर्षांतून एकदा जागा होतो; नागरिक मात्र दररोज जागा असतो. लोकशाहीला मतदारांपेक्षा सजग नागरिकांची जास्त गरज असते. गाव बदलायचे असेल तर ग्रामसभा बदलावी लागेल. लोकशाहीचा खरा प्रवास संसदेच्या पायऱ्यांवर सुरू होत नाही; तो गावाच्या चावडीपासून सुरू होतो. त्या चावडीवरच्या रिकाम्या खुर्च्या भरल्या तर भारतीय लोकशाहीच्या भविष्याचे अनेक प्रश्न आपोआप सुटू लागतील. अन्यथा निवडणुका नियमित होतील, सरकारे बदलतील, योजना येतील-जातील; पण लोकशाहीचा आत्मा हळूहळू संकुचित होत राहील. ■

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# रोख व्यवहार करताना सावधान!

आयकर कायद्यातील मर्यादा जाणून घ्या; अन्यथा व्यवहाराइतकाच दंड भरावा लागू शकतो. भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने डिजिटल होत आहे. तरीही अनेक व्यापारी, व्यावसायिक, बिल्डर, डॉक्टर, शेतकरी, संस्था तसेच सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात रोख व्यवहारास प्राधान्य देतात. आयकर कायद्यानुसार रोख व्यवहारांवर संपूर्ण बंदी नाही, परंतु ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त रकमेचे रोख व्यवहार केल्यास केवळ करसवलत नाकारली जात नाही, तर काही प्रकरणांत व्यवहाराच्या संपूर्ण रकमेइतका दंडही आकारला जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या नियमांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी बेहिशेबी रोख व्यवहार, मालमत्तेच्या खरेदी-विक्रीतील काळा पैसा, खोटे खर्च दाखवून करचुकवेगिरी तसेच कर्ज आणि ठेवींमधील अनधिकृत व्यवहार होत होते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आयकर कायद्यात विविध निर्बंध घालण्यात आले. बँकिंग माध्यमातून व्यवहार केल्यास प्रत्येक व्यवहाराची नोंद राहते. यामुळे व्यवहारांची सत्यता पडताळणे, कराची योग्य आकारणी करणे आणि आर्थिक शिस्त राखणे सुलभ होते.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम स्वीकारणे धोकादायक आयकर कायद्यातील कलम २६९ एसटी हे सर्वाधिक महत्त्वाचे मानले जाते. समजा, एखाद्या बिल्डरने फ्लॅट बुकिंगसाठी ३ लाख रोख स्वीकारले किंवा एखाद्या व्यापाऱ्याने ग्राहकाकडून २.५० लाख रोख घेतले, तर हा व्यवहार कायद्याचे उल्लंघन ठरू शकतो. विशेष म्हणजे, व्यवहाराची रक्कम वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये घेतली असली तरी जर ती एकाच व्यवहाराशी संबंधित असेल, तर आयकर विभाग त्या सर्व रकमा एकत्रितपणे पाहतो.

**मालमत्तेचे व्यवहार** – रिअल इस्टेट क्षेत्रात अनेक व्यवहारांमध्ये रोख रकमेचा वापर केला जातो. प्लॉट, फ्लॅट, दुकान, गाळा किंवा शेतजमीन खरेदी करताना 'थोडी रक्कम रोख आणि उर्वरित धनादेशाने' अशी पद्धत अनेक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र, अशा व्यवहारांमध्ये केवळ आयकरच नव्हे तर स्टॅम्प ड्युटी, भांडवली नफा, टीडीएस, बेनामी व्यवहार कायदा आणि अवैध सावकारीशी संबंधित कायद्यांचेही परिणाम उद्भवू शकतात. त्यामुळे मालमत्तेच्या व्यवहारात रोख रकमेचा वापर शक्यतो पूर्णपणे टाळणे हेच हिताचे ठरते.

**२० हजारांपेक्षा जास्त रोख कर्ज स्वीकारू नका :** अनेकदा मित्र, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीकडून तात्पुरत्या स्वरूपात रोख पैसे घेतले जातात. 'आपल्याच माणसाचे पैसे आहेत' असा विचार करून अनेक जण हा व्यवहार सुरक्षित समजतात. परंतु आयकर कायद्यातील कलम २६९एसएस नुसार २० हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम रोख स्वरूपात कर्ज, ठेव किंवा मालमत्ता खरेदीसाठी ॲडव्हान्स म्हणून स्वीकारण्यास मनाई आहे. याचप्रमाणे कलम २६९टी नुसार अशा कर्जाची रोख स्वरूपात परतफेड करणेही प्रतिबंधित आहे. या नियमांचे उल्लंघन झाल्यास दंड हा काही टक्के नसून व्यवहाराच्या रकमेइतका असू शकतो.

**व्यापाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी :** व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी कलम ४०ए (३) कडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. जर एखाद्या पुरवठादाराला एका दिवसात १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम रोख दिली, तर तो खर्च आयकरात ग्राह्य धरला जाणार नाही. परिणामी व्यवसायाचा नफा वाढल्याचे गृहीत धरले जाईल आणि कराचा भारही वाढेल. उदाहरणार्थ, एखाद्या व्यापाऱ्याने माल खरेदीसाठी ५ लाख रोख दिले आणि तो खर्च नाकारला गेला, तर त्याला त्या रकमेवर अतिरिक्त आयकर भरावा लागू शकतो.

**रोख देणगी दिल्यास करसवलत मिळेलच असे नाही :** धार्मिक, सामाजिक किंवा शैक्षणिक संस्थांना देणगी देताना अनेक नागरिक रोख रक्कम देतात. मात्र, २,००० रुपयांपेक्षा जास्त रोख देणगीवर कलम ८०जी अंतर्गत करसवलत मिळत नाही. जर करसवलतीचा लाभ घ्यायचा असेल, तर देणगी धनादेश, यूपीआय, एनईएफटी, किंवा इतर बँकिंग माध्यमातून देणे आवश्यक आहे.

**बँकेतून मोठी रोख रक्कम काढणे चुकीचे आहे का? :** हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. उत्तर आहे - नाही. स्वतःच्या खात्यातून पैसे काढण्यावर कोणतीही सर्वसाधारण बंदी नाही. परंतु मोठ्या प्रमाणावर रोख पैसे वारंवार काढले जात असल्यास त्याची माहिती आयकर विभागाकडे जाते. आवश्यक असल्यास विभाग त्या व्यवहारामागील कारणांची चौकशी करू शकतो. अनेक व्यापारी असा विचार करतात की, २ लाख एकाच वेळी न घेता ५०,००० चे चार हप्ते घेतले तर नियम लागू होणार नाही. हा अत्यंत धोकादायक गैरसमज आहे. जर सर्व रक्कम एकाच व्यवहाराशी संबंधित असेल, तर आयकर विभाग ती एकत्रित रक्कम मानतो.

**दंड किती होऊ शकतो? :** आयकर कायद्यातील काही तरतुदींमध्ये दंड हा व्यवहाराच्या रकमेइतका असू शकतो. याचा अर्थ - २ लाखांचा चुकीचा व्यवहार - २ लाख दंड. १० लाखांचा चुकीचा व्यवहार - १० लाख दंड. याशिवाय कर तपासणी, नोटीस, अपील, न्यायालयीन प्रक्रिया आणि व्यावसायिक प्रतिष्ठेवर होणारा परिणाम हा वेगळाच.

**सुरक्षित व्यवहारासाठी काही सोप्या सवयी :** शक्यतो सर्व मोठे व्यवहार बँकिंग माध्यमातून करा. प्रत्येक व्यवहाराची पावती आणि पुरावा जतन करा. मालमत्तेच्या व्यवहारात रोख रक्कम टाळा. व्यवसायाचे कॅश बुक नियमित लिहा. नातेवाईकांशी आर्थिक व्यवहार करतानाही कायद्याचे पालन करा. मोठा व्यवहार करण्यापूर्वी कर सल्लागाराचा सल्ला घ्या.

**सामान्य गैरसमज विरुद्ध वास्तव :** गैरसमज १ : '२ लाख चार हप्त्यांत घेतले तर नियम लागू होत नाही.', वास्तव : लागू होतो. गैरसमज २ : 'नातेवाईकांकडून पैसे घेतले तर नियम लागू होत नाही.' वास्तव : अनेक परिस्थितींमध्ये लागू होतो. गैरसमज ३ : 'कॅशमध्ये व्यवहार केला म्हणजे कर भरावा लागत नाही.' वास्तव : कर तर लागू होतोच; शिवाय दंडाचीही शक्यता असते. गैरसमज ४ : 'बँकेतून पैसे काढणे बेकायदेशीर आहे.' वास्तव : पूर्णपणे चुकीचे.

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न** (एफएक्यू) :

प्रश्न : लग्नात ३ लाख रुपये रोख भेट मिळाली तर? उत्तर : परिस्थितीनुसार कलम २६९एसटी लागू होऊ शकते.

प्रश्न : प्लॉट बुकिंगसाठी ५ लाख रोख घेऊ शकतो का? उत्तर : नाही. अत्यंत धोकादायक.

**निष्कर्ष :** रोख व्यवहार हा गुन्हा नाही; परंतु नियमांकडे दुर्लक्ष करून केलेला मोठा रोख व्यवहार आर्थिकदृष्ट्या अत्यंत महाग ठरू शकतो. आजच्या डिजिटल युगात बँकिंग माध्यमातून व्यवहार करणे ही केवळ सोय नसून कायदेशीर सुरक्षितताही आहे. एक छोटीशी चूक लाखो रुपयांच्या दंडाचे कारण बनू शकते. त्यामुळे प्रत्येक नागरिक, व्यापारी, व्यावसायिक, बिल्डर आणि उद्योगपती यांनी आयकर कायद्यातील रोख व्यवहारांच्या मर्यादा समजून घेऊनच आर्थिक व्यवहार करावेत. कायद्याचे पालन हे केवळ दंड टाळण्यासाठी नाही, तर पारदर्शक आणि विश्वासार्ह आर्थिक व्यवस्थेचा भाग होण्यासाठीही आवश्यक आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# किल्ला बदनाम झाला!

प्रश्न किल्ल्याचा नाही, समाजाच्या ढासळत्या मूल्यांचा आहे. लोहगड बदनाम झाला कशासाठी आणि कोणासाठी तर तो तुमच्या-आमच्या ढासळत्या मानसिकतेपोटी! सह्याद्रीच्या कुशीत शतकानुशतके ताठ उभा असलेला लोहगड कित्येक राजवटी पाहून गेला. युद्धं पाहिली, पराक्रम पाहिले, विश्वासघातही पाहिले. हजारो पर्यटक त्याच्या पायऱ्या चढले, इतिहास अनुभवला, निसर्गात रमले. पण, तोच लोहगड एका धक्कादायक घटनेमुळे, विकृत मानसिकतेमुळे चर्चेत आला. समाजमाध्यमांवर काही तासांत लाखो प्रतिक्रिया उमटल्या. तरुण पिढी मीम्स तयार करण्यात दंग झाली. शौर्यासाठी प्रसिद्ध ठरलेला लोहगड आता खुनाच्या क्रौर्यासाठी ओळखला जातो आहे. ज्या ठिकाणी एका तरुणीने तिच्या प्रियकराच्या मदतीने होणाऱ्या नवऱ्याचा खून केला, ते ठिकाण आता प्रेक्षणीय स्थळ होते आहे. ज्या लोहगडावर दिवसाला ७०० ते ८०० पर्यटक येत होते, त्या ठिकाणी आता दोन-अडीच हजार पर्यटक भेट देऊ लागले. इतकंच काय, त्या दुर्दैवी जागेचे बारसेही करण्यापर्यंत आपली मजल गेली आहे. कुठे जात आहोत आपण? गेल्या दोन दशकांत आपल्या विवाह संस्कृतीत मोठा बदल झाला आहे. पूर्वी विवाह म्हणजे दोन व्यक्तींसोबत दोन कुटुंबांचे, दोन संस्कारांचे आणि दोन परंपरांचे मिलन मानले जायचे. आज अनेक ठिकाणी विवाह 'इव्हेंट' झाला आहे. त्यातून संस्कार कधीचेच उडून गेले आहेत. आजचा तरुण आणि तरुणी अधिक शिक्षित आहेत, आर्थिक सक्षम आहेत. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही त्यांच्याकडे आहे. ते स्वागतार्ह असले तरी आपण आपली जबाबदारी विसरत आहोत. माझे आयुष्य, माझी मर्जी इथपर्यंतच आपण मर्यादित झालो आहोत. प्रत्येक निर्णयाचा परिणाम कुटुंबावर, मुलांवर, समाजावर आणि शेवटी स्वतःवरही होतो, हे समजावून सांगणारी पिढीही आता वृद्धावस्थेकडे सरकते आहे. दुसरीकडे समाजमाध्यमांच्या वेगात वैयक्तिक आयुष्य सार्वजनिक होऊ लागले आहे. नातेसंबंधांचे प्रदर्शन वाढले. पण, नात्यांचा गाभा कमी झाला. प्रेम व्यक्त करण्याची साधने वाढली. आज अनेक तरुण-तरुणी भावनिकदृष्ट्या एकाकी आहेत. मन मोकळे करण्यासाठी कोणीच नाही. संयुक्त कुटुंब पद्धती हळूहळू कमी झाली. घरात रागावणारे, समजावणारे, सांभाळणारे नाहीत. आई-वडील दोघेही नोकरीत, मुलांना वेळ कमी दिला जात असल्याने संवाद कमी झाला. घरात कोंडून असलेल्या मुलांच्या संस्कारांची जागा मोबाईलने घेतली. पालकांनी मुलांना उत्तम शिक्षण दिले. पण, आयुष्य जगण्याचे शिक्षण कितपत दिले? अपयश स्वीकारायला शिकवले का? नाती टिकवायला शिकवले का? तर, या प्रश्नांचे उत्तर नकारार्थीच मिळते. शिक्षण व्यवस्थेत मूल्यांऐवजी गुणांना महत्त्व. न्याय व्यवस्थेकडे समाज मोठ्या अपेक्षेने पाहतो. गुन्हा घडल्यानंतर कठोर शिक्षा व्हावी, ही अपेक्षा योग्यच आहे. पण, न्याय केवळ शिक्षेपुरता मर्यादित नसतो. गुन्हे घडू नयेत, अशी सामाजिक परिस्थिती निर्माण करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. कायद्याची भीती आणि समाजाचे भान या दोन्ही गोष्टी एकत्र असल्या तरच गुन्हे कमी होतील आणि लोहगडावर घडलेल्या घटना आपोआप कमी झालेल्या दिसतील. आज लोहगडवर झालेल्या घटनेत आणि त्यानंतर त्याचे जे कवित्व सुरू आहे त्यातून आपण आपल्या पुढच्या पिढीला नेमके काय देतो आहोत? कालची घटना नजरेआड करून नक्कीच चालणार नाही. त्या घटनेने एक संदेश दिला आहे. या घटनेने लोहगडाचे महत्त्व किंचितही कमी होणार नाही. लोहगड इतिहासासाठीच ओळखला जात होता आणि जाईलही. त्याच्या तटबंदीवर पुन्हा पर्यटक जातील, फोटो काढतील, इतिहास आठवतील. पण, काल-परवा झालेल्या घटनेतून आपण काही शिकलो नाही, तर उद्या दुसरा एखादा किल्ला, दुसरे एखादे शहर, दुसरे एखादे गाव अशाच कारणाने बदनाम होईल. एका मुलीने होणाऱ्या नवऱ्याला धकलून दिल्याने लोहगड नव्हे तर आपली मानसिकता बदनाम झाली. सामाजिक मूल्य पायदळी तुडवली जात आहेत. त्या किल्ल्याचे दगड अजूनही मजबूत आहेत. कमकुवत आपण झालो. घटनेचे गांभीर्य विसरून त्यावर विनोद सुचत आहेत. आज प्रश्न लोहगडचा नाही, आपल्या मुलांचा आहे, आपल्या संस्कारांचा आहे आणि उद्याच्या पिढीचा आहे. समाज बदलण्याची पहिली शाळा अजूनही कुटुंबच आहे, हे विसरून चालणार आहे. लोहगडाला बदनाम करणे थांबवा; त्याचा इतिहास कायम ठेवा. पर्यटकांना लोहगडावर इतिहास जाणून घ्यायला येऊ द्या... इतिहासात शत्रूला टकमकच्या टोकाहून कडेलोट करून शिक्षा दिली जात होती. पण, तो आमचा इतिहास होता. तसाच इतिहास कायम ठेवा. त्याला एका घटनेने विकृत करू नका... लोहगडाला प्रेम प्रकरणातील खुनाच्या जोखडात अडकून ठेवू नका. ■

९८८१९०३७६५

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# जलसंवर्धनासाठी एआय!

भारतात या वर्षी कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हवामान बदल, वाढते तापमान, भूजलाची घटती पातळी आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाण्याचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध जलस्रोत मात्र मर्यादित होत आहेत. अशा परिस्थितीत केवळ जलसंधारण पुरेसे नाही, तर उपलब्ध पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करणे आवश्यक झाले आहे. येथेच कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेटशी जोडलेली उपकरणे, सूक्ष्म संगणकीय चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आज आपण ज्या पद्धतीने पाणी वापरतो, त्यात मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. अनेक शेतकरी मोटार सुरू करून बंद करायला विसरतात. टाक्या भरल्यानंतरही पाणी वाहत राहते. गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया जाते. अनेक ठिकाणी पाण्याचे वितरण नियोजनशून्य असते. या सर्व समस्यांवर डिजिटल तंत्रज्ञान प्रभावी उपाय देऊ शकते. शेती हे भारतातील सर्वाधिक पाणी वापरणारे क्षेत्र आहे. अनेकदा पिकांना आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी दिले जाते. यामुळे पाण्याचा अपव्यय होतोच. आधुनिक मृदा आर्द्रता मापक संवेदक जमिनीतील ओलावा सतत मोजतात. हे संवेदक सूक्ष्म चिप्सद्वारे माहिती संकलित करून संगणक किंवा भ्रमणध्वनीवर पाठवतात. कृत्रिम बुद्धिमत्ता या माहितीचे विश्लेषण करून पिकाला नेमके किती पाणी आवश्यक आहे हे ठरवते. त्यामुळे आवश्यक तेवढेच सिंचन होते आणि पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. अशा प्रकारच्या यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञान पारापर्यंत आणत असून जलसंवर्धनाच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

स्वयंचलित पंप नियंत्रण ही आणखी एक क्रांतिकारी संकल्पना आहे. पाण्याच्या टाकीत किंवा विहिरीत बसवलेले संवेदक पाण्याची पातळी सतत मोजतात. टाकी रिकामी झाल्यास पंप आपोआप सुरू होतो आणि टाकी भरल्यावर बंद होतो. त्यामुळे पाणी ओसंडून वाहण्याची समस्या संपते. आधुनिक संवेदक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली पाईपलाईनमधील दाबातील बदलांचे विश्लेषण करून गळतीचे अचूक ठिकाण शोधू शकतात. यामुळे लाखो लिटर पाण्याची



बचत होते. जगातील अनेक शहरांमध्ये अशा स्मार्ट जलव्यवस्थापन प्रणाली यशस्वीपणे वापरल्या जात आहेत. पर्जन्यमानाचा अचूक अंदाज घेण्यासाठी देखील आज कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरत आहे.

शहरे आणि महानगरांमध्ये स्मार्ट जलमीटर मोलाची भूमिका बजावू शकतात. हे मीटर प्रत्येक घरातील पाणीवापराचे अचूक मोजमाप करतात. अचानक वापर वाढल्यास किंवा गळती आढळल्यास तत्काळ सूचना मिळते. नागरिकांना त्यांच्या वापराचे विश्लेषण पाहता येते आणि बचतीसाठी उपाय करता येतात. भविष्यात प्रत्येक घरात असे स्मार्ट जलमीटर बसवले गेल्यास शहरी भागातील पाण्याचा अपव्यय लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सहायक गावागावांमध्ये जलजागृतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. धरणे, तलाव आणि जलाशयांच्या व्यवस्थापनातदेखील डिजिटल तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त भूमिका बजावू शकते. विविध ठिकाणी बसवलेले संवेदक पाण्याची पातळी, गुणवत्ता आणि साठ्याची माहिती सतत गोळा करतात. भूजल पातळीचा अभ्यास करण्यासाठीही आधुनिक चिप्स आणि संवेदक वापरले जाऊ शकतात. विविध विहिरींमधील पाण्याची पातळी मोजून कृत्रिम बुद्धिमत्ता भूजलाचा नकाशा तयार करू शकते.

पाणी गुणवत्तेचे परीक्षणदेखील अत्यंत महत्त्वाचे काम आहे. अनेक गावांमध्ये दूषित पाण्यामुळे आरोग्य समस्या निर्माण होतात. अशा वेळी तांत्रिक करामतीतून उभे राहणारे आधुनिक संवेदक पाण्यातील अशुद्धता, रासायनिक घटक आणि प्रदूषणाचे प्रमाण तपासू शकतात. पाण्याची गुणवत्ता खराब झाल्यास त्वरित सूचना मिळते. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे सुरक्षित पाणी उपलब्ध करून देता येते. भारतातील स्टार्टअप उद्योग आणि तरुण अभियंत्यांसाठी हे क्षेत्र मोठी संधी निर्माण करत आहे. कमी खर्चातील संवेदक, स्वदेशी चिप्स, स्मार्ट सिंचन प्रणाली, जलविश्लेषण सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाय विकसित करून जागतिक बाजारपेठेत प्रवेश करता येऊ शकतो. ग्रामीण भारतासाठी परवडणारे आणि स्थानिक गरजांनुसार तयार केलेले उपाय या कामी विशेषतः महत्त्वाचे ठरणार आहेत. असे असले तरी यासंदर्भात तंत्रज्ञान हे प्रश्नांवरील एकमेव उत्तर नाही. नागरिकांमध्ये पाणीबचतीची जाणीव निर्माण करणे तेवढेच आवश्यक आहे. गळणारे नळ दुरुस्त करणे, पावसाचे पाणी साठवणे, पुनर्वापर वाढवणे, वाहन धुण्यासाठी कमी पाणी वापरणे आणि शेतीत सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करणे या सवयी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान आणि जबाबदार नागरिकत्व यांचा संगम झाल्यासच खरे जलसंवर्धन साध्य होईल.

हल्ली पावसाचे भाकीत वर्तवणे विशेष कौशल्याचे काम बनत आहे. त्यातल्या त्यात काही वेळात अचानक मोठा पाऊस पडून जात असल्यामुळे आणि नंतर तो अचानक गायब होत असल्याने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन आवश्यक बनत आहे. आजघडीला तर या वर्षी पाऊस काहीसा रुसलेला राहील, असेही आवर्जून सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच धोरणकर्त्यांच्या मनात आधीच शंकेची पाल चुकचुकत आहे. कमी पावसाच्या शक्यतेमुळे येणारी वर्षे आव्हानात्मक ठरू शकतात. परंतु योग्य नियोजन, डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ यामुळे प्रत्येक थेंबाचे व्यवस्थापन शक्य आहे. भविष्यातील भारताला पाणीसुरक्षित बनवायचे असेल तर जलसंधारणाबरोबरच स्मार्ट जलव्यवस्थापन स्वीकारावे लागेल. प्रत्येक थेंब मोलाचा आहे आणि त्या प्रत्येक थेंबाचे संरक्षण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संवेदक, चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान ही आजची नव्हे तर उद्याची अपरिहार्य गरज बनली आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### नराधमाला त्वरित फासावर लटकवा

नसरापूर प्रकरणातील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या नराधम भीमराव कांबळेला भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यातील विविध कलमांखाली दोषी ठरवून विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी मरेपर्यंत फाशीची शिक्षा दिल्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. नराधम भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा मिळावी यासाठी राज्यभर संतापाची लाट निर्माण झाली होती. राज्य सरकारची तत्परता व पुणे ग्रामीण पोलिस तसेच पोलिस विशेष पथकाने गुन्हा घडल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत आवश्यक ते पुरावे गोळा करून तत्परता दाखवल्याने खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागल्याबद्दल खूप अभिनंदन! अत्याचार आणि खून खटल्यातला सर्वांत जलदगतीने निकाल लागलेला हा राज्यातील पहिलाच खटला ठरला आहे. यामुळे अत्याचाराला बळी पडलेल्या चिमुकलीला व पालकांना न्याय मिळाला आहे. असा अत्याचार करणाऱ्या नराधमांना या निकालाने वचक बसणार आहे. विशेष न्यायालयात राज्य सरकारने पक्षपात न करता अत्याचार होणाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून खटले चालविल्यास अत्याचार करणाऱ्या नराधमांना जन्माची अद्दल घडेल.

**शशिकांत जाधव**/पुणे. ९६५७७५२६६५

* * *

### नाट्यसृष्टीतील दीपस्तंभ विजया मेहता

मराठी रंगभूमीवर ज्यांना आदराने सारे जण 'बाई' म्हणून ओळखत, त्या ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या निधनाने मराठी नाट्यविश्वावर दुःखाची गडद छाया पसरली आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्तिमत्त्व हरपले नाही, तर मराठी रंगभूमीचे एक वैभवशाली पर्वच संपुष्टात आले. विजयाबाईंनी केवळ नाटके दिग्दर्शित केली नाहीत, तर मराठी रंगभूमीला नवी दृष्टी, नवे विचार आणि नवे सौंदर्यशास्त्र दिले. नाटक ही केवळ करमणुकीची कला नसून ते समाजाशी संवाद साधणारे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या प्रत्येक कलाकृतीतून सिद्ध केले. त्यांच्या दिग्दर्शनात कलात्मकता, वास्तवदर्शन आणि मानवी भावविश्वाचा सूक्ष्म वेध यांचा अप्रतिम संगम दिसून येत असे.

हमिदाबाईची कोठी, वाडा चिरेबंदी, पुरुष, बॅरिस्टर, महासागर, शितू अशा अनेक गाजलेल्या नाटकांना त्यांनी आपल्या दिग्दर्शनाचा सुवर्णस्पर्श दिला. त्यांच्या कल्पक दिग्दर्शनामुळे या नाट्यकृती केवळ यशस्वी ठरल्या नाहीत, तर मराठी रंगभूमीच्या इतिहासात अजरामर झाल्या. अनेक दिग्गज लेखकांच्या साहित्यकृती त्यांनी रंगमंचावर नव्या उंचीवर नेल्या. विजयाबाईंचे आणखी एक मोठे योगदान म्हणजे त्यांनी घडविलेली कलाकारांची पिढी. अनेक नामवंत अभिनेते-अभिनेत्री आणि रंगकर्मी त्यांच्या मार्गदर्शनातून घडले. कलाकाराच्या अभिनयातील सूक्ष्म छटा ओळखून त्याला सर्वोत्तम सादरीकरणासाठी प्रेरित करण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यात होती. प्रेक्षकांना नाटकाच्या गाभ्यापर्यंत कसे पोहोचवायचे, याचे जिवंत विद्यापीठ म्हणजे विजयाबाई होत्या.

विजयाबाईंची शारीरिक अनुपस्थिती आज जाणवत असली, तरी त्यांनी उभे केलेले नाट्यविश्व, त्यांनी घडविलेले कलाकार आणि त्यांनी रुजविलेली कलादृष्टी हीच त्यांची चिरंतन स्मृती आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे अशक्य आहे. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

* * *

### वर्क फ्रॉम होम; सोय आणि गैरसोय

कोरोना काळात घरून काम सुरू होते. सरकारी कामे पण घरून सुरू होती. अजूनही काही कंपन्यामध्ये घरूनच कामे सुरू आहेत. काही ठिकाणी आठवड्यांतून एकदा कामाच्या ठिकाणी जावे लागते. खरेच घरून काम करणे अनेक जणांना खूप सोयीचे झाले आहे. घरात पूर्ण वेळ राहिल्यामुळे घरात लक्ष राहते. लहान मुले, ज्येष्ठ व्यक्ती असल्यास काम करणारा असेल तर लक्ष राहते. कधीकधी काम करणारे ठेवायची गरज भासत नाही. दुसरे असे की कार्यालयात जाण्याचे टेन्शन नाही. वेळेवर लॉगइन केले की काम सुरू होते. इंधन बचतही होते. हे सर्व खरे असले तरी काही ठिकाणी गैरसोयीचे आहे.

मोठे घर असेल तर स्वतंत्र खोली असते. टेबल-खुर्ची असते. घरांतील इतरांना त्रास होत नाही. पण लहान घरात गैरसोयीचे होते. स्वतंत्र खोलीचा वापर करताना घरातील इतरांची गैरसोय होते. ज्येष्ठांना तर खूप त्रासदायक होते. सतत हॉलमध्येच वापर करायचा. आवाज नको. आणखी एक, घराच्या बाहेर कंपनीत चार जणांबरोबर काम करताना खूपच छान वातावरण असते. एकमेकांशी बरेच काही तेव्हाच शेअर केले जाते. तुम्हाला वेळेवर पोहोचायचे तर दिनचर्या चांगली राहते. वर्क फ्रॉम होम सोय-गैरसोय दोन्हीही आहे. ■

**अंजली पळणीटकर**/नागपूर

* * *

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक : विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत मतदारांनी सहभागी व्हावे - राजकिशोर मोदी

## पुनरीक्षण मोहिमेंतर्गत मोदी यांच्या निवासस्थानी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांची गृहभेट

**अंबाजोगाई :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने राज्यभर मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन प्रत्येक मतदाराची माहिती पडताळून गणना प्रपत्र भरून घेत आहेत. या महत्त्वपूर्ण लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून आपली अद्ययावत माहिती बीएलओंना उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष, तथा अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन तथा अंबाजोगाई विकास आघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

या विशेष मोहिमेच्या जनजागृतीचा एक भाग म्हणून उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, नायब तहसीलदार तसेच नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी श्री.देशपांडे यांनी राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी भेट देऊन मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांच्या कुटुंबातील मतदारांची माहिती तपासण्यात आली, आवश्यक गणना प्रपत्र भरून घेण्यात आले तसेच माहितीचे पुनरीक्षण करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी सांगितले की, मतदार यादीतील त्रुटी दूर करून ती अधिक विश्वासार्ह करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे.

प्रत्येक पात्र नागरिकाचे नांव मतदार यादीत समाविष्ट होणे, चुकीची अथवा अपूर्ण माहिती दुरूस्त करणे आणि मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नांवे नियमानुसार वगळणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे नागरिकांनी बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देत प्रशासनाला सहकार्य करावे. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा अधिकार



आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने मतदार यादीत आपले नांव योग्य प्रकारे नोंदलेले आहे की नाही, याची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने राबविलेली ही मोहीम नागरिकांच्या सोयीसाठी असून बीएलओ स्वतः घरोघरी येऊन माहिती संकलित करीत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची गैरसमजूत न बाळगता प्रत्येकाने या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा.

या मोहिमेद्वारे मतदारांच्या नांवातील दुरूस्ती, पत्ता बदल, विवाहानंतर आडनावातील बदल, मृत मतदारांची नावे वगळणे, नवीन पात्र मतदारांची नोंदणी, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झालेल्या मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच इतर आवश्यक बदलांची प्रक्रिया बीएलओंच्या माध्यमातून केली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सर्व मतदारांची माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक ती माहिती अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी. बीएलओ नागरिकांच्या घरी भेट देऊन अधिकृत ॲपच्या माध्यमातून सर्व माहिती ऑनलाइन नोंदविणार आहेत. यासाठी मतदारांनी मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक (स्वेच्छेने), अलीकडील छायाचित्र, रहिवासी पत्त्याचा पुरावा तसेच आवश्यकतेनुसार इतर कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याशिवाय भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि संबंधित ऑनलाइन सुविधांद्वारेही मतदारांना स्वतःची माहिती पडताळण्याची व आवश्यक बदलांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओंच्या घरोघरी भेटी व गणना प्रपत्र संकलन, २९ जुलैपर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारणे, त्यानंतर ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींची सुनावणी व निकाली काढण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी मतदार यादी अचूक असणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर व परिसरातील सर्व नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. प्रत्येक पात्र नागरिकाचे नांव मतदार यादीत समाविष्ट होणे आणि प्रत्येक मतदाराची माहिती अद्ययावत राहणे हीच या मोहिमेची खरी यशस्वीता ठरेल, हि मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी अंबाजोगाई विकास आघाडीचे उपनगराध्यक्ष, गटनेते, विविध विषय समित्यांचे सभापती, सर्व नगरसेवक, सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रशासनाला सर्वोतोपरी सहकार्य व मतदारांची जनजागृती करावी असे आवाहन अंबाजोगाई विकास आघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी यांनी केले.

## केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी चे आज जुलै रोजी होणार थाटात उदघाटन

**अंबाजोगाई :** मागील 14 वर्षापासून हेल्थ इन्शुरन्स मध्ये नावाजलेल्या केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीच्या ब्रँच ऑफिसचे अंबाजोगाई येथे चार जुलै रोजी उदघाटन कंपनीचे झोनल हेड जगदेव सिंह चव्हाण यांच्या हस्ते व रिजनल हेड गौरव बेंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

हेल्थ इन्शुरन्स मध्ये अग्रेसर असणाऱ्या केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी ने अंबाजोगाई परिसरात बऱ्याच लोकांना हेल्थ इन्शुरन्स देऊन सेवा देत आहे. याचा परिसरातील लोकांना फायदा व्हावा यासाठी कंपनीने लोकांच्या सेवा व्यवस्थित देता याव्यात यासाठी शाखा कार्यालय सुरू करण्यात येणार असल्याची माहिती लातूर एरिया हेड दिपक देशमुख यांनी दिली आहे. अंबाजोगाई येथे चार वर्षापासून ग्राहकांचा उदंड प्रतिसाद असल्याने त्यांना लातूर ऑफिसमधून सेवा मिळत होती. हेल्थ प्लॅनर यांना लातूर येथे जावे लागत होते ती गैरसोय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करून अंबाजोगाई चे ब्रँच मॅनेजर सचिन भोकरे यांनी अंबाजोगाई येथे शाखा कंपनी कडून मंजूर करून घेतली आहे. हि शाखा विवेक सिंधू कॉम्प्लेक्स, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथे चार जुलै पासून ग्राहकांसाठी कार्यान्वित राहणार आहे. सर्व ग्राहकांनी, सेल्स मॅनेजर, हेल्थ प्लॅनर यांनी हेल्थ इन्शुरन्स सेवेचा लाभ अंबाजोगाई येथील कार्यालयातून घ्यावा असे आवाहन ब्रँच मॅनेजर सचिन भोकरे यांनी केले आहे.

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये वन महोत्सव सप्ताहाचे आयोजन

**बीड (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. १) 'वन महोत्सव सप्ताह–२०२६' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षणाची 'हरित शपथ' घेतली. तसेच महाविद्यालयातील कार्यालये, विभाग आणि वर्गखोल्यांमध्ये कुंडीतील शोभिवंत रोपे ठेवून परिसर अधिक हिरवागार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपप्राचार्या श्रीमती सय्यद शहाना यांनी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी श्वेता वंजारे यांनी केले. सूत्रसंचालन शिवानी खुरे, तर आभार सीमा प्रजापती हिने मानले. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. विद्या अवघडे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## भारत डिजिटल क्रांतीद्वारे अर्थसत्तेत चौथ्या स्थानी...

आज आपलं सारं आयुष्य गतिमान झालं आहे आणि कामाची गती वाढण्याचं कारण अर्थातच भारतात झालेली डिजिटल क्रांती. भारतात साध्या बाबी सोप्या पध्दतीने कमी वेळात आणि कमी खर्चात व्हाव्यात यासाठी डिजिटल क्रांतीची सुरुवात करण्यात आली याला आता 11 वर्षे पुर्ण झाली आहेत. डिजिटल क्रांतीचा लाभ भारतासारख्या देशात नेमकेपणाने किती जणांना होईल याबाबत सुरुवातीला असलेल्या शंका आता पुर्णपणे मोडित निघाल्या आहे. काही बाबतीत याचा लाभ मिळणं अद्याप बाकी असलं तरी झालेलं काम देखील खूप मोठं आणि मोलाच आहे. केंद्र आणि राज्य शासनातर्फे लोकांसाठी विविध लाभकारी योजना राबवतं. या योजनांचा लाभ केंद्र – राज्य- जिल्हा आ णि कार्यालय अशा साखळीमुळे विलंबाने होत असे यात थेट आर्थिक लाभाच्या अनेक योजना आहेत. शेतकरी सन्मान निधीपासून निराधार योजना, विद्यार्थी शिष्यवृत्ती अशा अनेक योजनांचा यामध्ये समावेश आहे. या सर्व योजनांमधील लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण अर्थात लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ देण्यास सुरुवात या डिजिटल क्रांतीमुळे शक्य झाली. गेल्या 11 वर्षाच्या कालावधीत 51लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा झाली आहे.

या डिजिटल क्रांतीसाठी मोठ्या प्रमाणावर मुलभूत सुविधांचा विस्तार आ णि बांधणी आवश्यक होती. 140 कोटी लोकांच्या आपल्या देशात 65 ते 70 टक्के जनता ग्रामीण भागात राहते. या सर्वांना डिजिटल युगात नेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दळण-वळण यंत्रणा उभारणीचे आव्हान होते. या 11 वर्षाच्या कालावधीत देशात 42 लाख किलोमिटरहून अधिक लांबीचे ऑप्टीक फायबर नेटवर्क उभारण्यात आल.

# अंबाजोगाई बस स्थानकात चालकाचा निष्काळजीपणा; बसच्या धडकेत भोळसर महिला गंभीर जखमी!

## नागरिकांनी तत्परता दाखवत महिलेला रुग्णालयात हलवून दाखवली माणुसकी

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई बस स्थानक परिसरात पुन्हा एकदा एसटी चालकांच्या निष्काळजीपणाचा अत्यंत गंभीर आणि चीड आणणारा प्रकार समोर आला आहे. स्थानक परिसरात फिरणाऱ्या एका भोळसर महिलेला बस स्थानकातून बाहेर पडणाऱ्या लातूर-परभणी बसने जोरदार धडक दिली. चालकाने बस निष्काळजीपणे आणि भरधाव वेगाने चालविल्यामुळे हा अपघात घडला असून, यामध्ये ती महिला गंभीर जखमी झाली आहे. अपघात घडताच घटनास्थळी उपस्थित असलेल्या सुजाण नागरिकांनी तात्काळ धाव घेत तत्परता दाखवली आणि जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करून माणुसकीचे दर्शन घडवले.



मात्र, या अपघाताच्या निमित्ताने अंबाजोगाई बस स्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अंबाजोगाई बस स्थानकात असे गंभीर अपघात वारंवार का घडत आहेत, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. यापूर्वीही अनेक निष्पाप प्रवाशांनी आणि नागरिकांनी स्थानक परिसरातील ढिसाळ नियोजनामुळे आणि अपघातांमुळे आपले हात-पाय कायमचे गमावले आहेत, तर काहींना आपल्या प्राणालाही मुकावे लागले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुर्घटना घडत असतानाही बस स्थानकातील अंतर्गत वाहतूक व्यवस्थापन आणि निष्काळजी चालकांवर एसटी महामंडळाकडून कोणतीही ठोस कारवाई का होत नाही, याबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अंबाजोगाई बस स्थानक परिसर सध्या अपघाताचे केंद्र बनत चालले असून, प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. वारंवार होणाऱ्या या दुर्घटनांमुळे प्रवाशांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

एसटी महामंडळ आणि स्थानिक प्रशासन आता तरी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन जागे होणार का, की आणखी एखाद्या निष्पाप जीवाचा बळी जाण्याची वाट पाहणार, असा संतप्त आणि धारदार सवाल आता संपूर्ण अंबाजोगाईकरांकडून विचारला जात आहे. या ठिकाणी तातडीने वाहतूक नियंत्रक नेमण्याची आणि वेगमर्यादेचे नियम कडक करण्याची मागणी होत आहे.

## स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय बीड मध्ये रोजगार मेळावा संपन्न

**बीड (प्रतिनिधी) :** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व मार्गदर्शन केंद्रबीड पंदीनदयाळ उपाध्याय फ्लेसमेंट ड्राइव्ह रोजगार मेळावा स्वा सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यामिक विद्यालय बीड मध्ये आयोजित करण्यात आला. पदवीधर युवकांना रोजगार संधी उपलब्ध करणे विशेष मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात आले .

प्रा चंद्रकांत मुळे यांनी युवकांना मार्गर्शन केले यावेळी त्यांनी युवकानी या संधीचा लाभ घ्यावा तसेच पात्रतेनुसार संधी अनेक उपलब्ध आहेत याचा फायदा घ्यावा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत सात प्रशिक्षणर्थीना विद्यावेतन वर नियुक्ती देण्यात आली . प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थित मान्यवर मुख्याध्यापक प्रा चंद्रकांत मुळे , उप मुख्याध्यापक उमेश जगताप, जयदत्त इंगोले रोजगार मेळावा प्रमुख ऋषीकेश टाकणखार जि समन्वयक बीड प्रा बाळासाहेब साळवे गणेश गुरुखुदे उपस्थित होते.

## शेतकरी हिताला प्राधान्य देणारी कर्जमुक्ती...

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करणारी घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना 2026 या अंतर्गत निसर्गाची सर्व रुपे झेलत शेतात राबून आपल्यासाठी अन्न धान्य उत्पादन करणाऱ्या बळीराजाला वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागते. या बळीराजाला समर्पित अशी ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे.

आपला देश मौसमी हवामानाच्या प्रदेशात आहे आणि बदलते ऋतूचक्र आणि वेळोवेळी येणारी नैसर्गिक आव्हाने झेलत शेती करणे अतिशय कष्टाचे काम आहेच सोबतच लहरी निसर्गाने अवेळी येणारा पाऊस, अतिवृष्टी तर कधी गारपीट याने पेरलं ते उगवलं तरी त्याला बाजारपेठ मिळणं व योग्य भाव मिळणं यांच संकट त्याच्यासमोर असतं. सतत तणाव सहन करीत शेतकरी मेहनत करीत असताना आणि त्याच्या कष्टाचं मोल जाणून कर्जमुक्तीची योजना शासनाने आणली आहे.

शासनाने याबाबत जे निकष लावले आहेत ते जाणून घेणे महत्वाचे आहे. यात कर्जमुक्तीची व्याप्ती अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा अशीच ठेवण्यात आली आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग या विभागांकडे याची अंमलबजावणी सोपविण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतर पध्दतीने अर्थात डीबीटी अंतर्गत याचा लाभ मिळणार आहे.

दोन लाख किंवा त्यापेक्षा कमी कर्ज असेल तर त्या शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यात कर्जाची थकीत रक्कम थेट लाभ स्वरुपात प्राप्त आहे. यासाठी त्याचे बँक खाते आणि आधार क्रमांक संलग्न असणे आवश्यक आ हे. जे शेतकरी नियमितपणे कर्जाचा हप्ता बँकेत नियमितपणे भरतात त्या सर्वांना प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे त्यानुसार अशा शेतकरी बांधवांना त्यांच्या बँक खात्यात 50 हजार रुपये प्रोत्साहन स्वरुपात दिले जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर सातत्याने शेतकरी केंद्रस्थानी ठेवत अने महत्वाचे निर्णय घेतले आहेत. आणि त्यासाठी विशेष योजना तयार करुन त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होवून याचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा असे प्रयत्न केले आहेत. आजवरच्या धोरणात्मक निर्णयामध्ये हा कर्जमुक्तीचा निर्णय शेतकऱ्यांना संकटातून सावरण्यास मदत तर करणार आहेच सोबतच यातून नवी वाट त्यांना मिळेल याचाही या निर्णयात विचार झाला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे. यालाही विशेष महत्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन आणि ग्रामीण विकासाचा विचार करणाऱ्या आणि शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्षात हा निर्णय घेण्यात आला याला विशेष महत्व आहे.

- प्रशांत दैठणकर
9823199466

# संस्था, जनता आणि प्रशासन यांच्या समन्वयातून "ग्लोबल गाव" घडेल - जलनायक मयंक गांधी

## कृषीकुल येथे महसूल विभाग व तालुक्यातील सर्व पोलिस पाटील यांची व्यापक बैठक

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र, सिरसाळा येथे शुक्रवार (ता.26) रोजी आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत तालुक्यातील सर्व गावांचे पोलिस पाटील, महसूल विभागाचे तलाठी, मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांतील मान्यवर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी "25 लक्ष वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान" तसेच "ग्लोबल गाव" स्पर्धेची सविस्तर माहिती देण्यात आली. बैठकीत वृक्ष लागवड ही केवळ एकदिवसीय मोहीम नसून लावलेल्या प्रत्येक रोपाचे संवर्धन, संरक्षण आणि जगविणे हीच अभियानाची खरी यशस्विता आहे, यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक गावाने लोकसहभागातून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संवर्धनाबरोबरच जलसंधारण, जैवविविधता आणि शाश्वत ग्रामीण विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी जलनायक मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या विविध लोकाभिमुख उपक्रमांची माहिती देत, शेती, पाणी, पर्यावरण आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात सुरू



असलेल्या कामांचा अधिकाधिक शेतकरी बांधवांना लाभ मिळावा, यासाठी प्रशासन आणि ग्रामस्तरावरील सर्व घटकांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. मयंक गांधी म्हणाले, "वृक्ष लावणे ही सुरुवात आहे; पण त्या प्रत्येक वृक्षाला जगविणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. 25 लाख वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियानातून प्रत्येक गावाने हरित विकासाचा संकल्प करावा. लोकसहभाग, प्रशासनाचे सहकार्य आणि ग्रामस्थांची जबाबदारी या त्रिसूत्रीच्या बळावर आपण पर्यावरण समृद्ध करण्यासोबतच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित, समृद्ध आणि स्वावलंबी गावे घडवू शकतो."

शुक्रवारी कृषीकुल येथे झालेल्या व्यापक बैठकीस डॉ.हरिश्चंद्र वंगे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रूपनर, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, तालुका कृषी अधिकारी अर्चना नागरगोजे, परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक सय्यद मजहर आली, सिरसाळा पोलिस उप निरीक्षक राठोड बाबा भिलू यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. उपस्थितांनीही वृक्षसंवर्धन, ग्रामविकास आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. तसेच 25 लक्ष वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान आणि ग्लोबल गाव स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशासन व ग्रामपातळीवरील यंत्रणा पूर्ण सहकार्य करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा, लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नयेत; शासनाचे स्पष्ट आदेश

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत.

मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समजोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही देण्यात येणार आहे.


या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली तहसील कार्यालयाचा जिल्हाधिकारी गुप्तांकडून सखोल आढावा

## प्रलंबीत प्रकरणे तत्काळ निकाली काढण्याचे दिले निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज हिंगोली तहसील कार्यालयास भेट देऊन तालुक्यातील मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. महसूल विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित कामे आणि नागरिकाभिमुख सेवांचा सखोल आढावा घेत त्यांनी कामकाजात गती, अचूकता व पारदर्शकता राखण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ तसेच तालुक्यातील मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी गुप्ता यांनी जमाबंदी आयुक्तांनी दिलेल्या सूचनांनुसार विविध प्रपत्रांची पूर्तता, शासकीय व गायरान जमिनींची सद्यस्थिती, शर्तभंग प्रकरणांचा शोध, फेरफार प्रकरणे, ॲग्रीस्टॅक नोंदणी, पीएम-किसान योजनेअंतर्गत नोंदणी, शेतरस्त्यांच्या अर्जांची निर्गती, पीक्यूजे प्रणालीचा प्रभावी वापर तसेच बळीराजा पाणंद रस्ते योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्यावर भर देत नागरिकांना दर्जेदार व वेळेवर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश दिले. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नोंदींची अचूकता तसेच महसूल कामकाजात पारदर्शकता राखण्याबाबतही त्यांनी संबंधितांना सूचना केल्या.

या बैठकीनंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील यांच्यासमवेत हिंगोली येथील शासकीय धान्य गोदामाला भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी धान्य साठवणुकीची व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षितता तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी उपलब्ध धान्यसाठ्याची माहिती त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली. सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना दर्जेदार धान्याचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी धान्य साठवणूक व वितरण व्यवस्थेमध्ये आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वन महोत्सावानिमित्त वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**

पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि वृक्ष लागवडीला लोकचळवळीचे रूप देण्यासाठी आज, दिनांक ३ जुलै २०२६ रोजी हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भव्य प्रांगणात 'वन महोत्सव वृक्ष लागवड' कार्यक्रमाचा शानदार शुभारंभ करण्यात आला. माननीय जिल्हाधिकारी श्री. राहुल गुप्ता साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या देशव्यापी मोहिमेला जिल्ह्यात सुरुवात झाली.

याप्रसंगी सामाजिक वनीकरणविभागाच्या वनाधिकारी पुष्पा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. निसर्गाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि दीर्घायुष्य असलेल्या भारतीय प्रजातींच्या वृक्षांवर या कार्यक्रमात प्रामुख्याने भर देण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि विभागीय वन अधिकारी पवार यांच्या हस्ते वड, पिंपळ, आणि उंबर यांसारख्या पवित्र व औषधी गुणांनी युक्त असलेल्या प्रजातींची वृक्ष लागवड करण्यात आली. केवळ वृक्ष लागवड न करता त्यांचे संवर्धन व जतन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी संदीप शिंदे, वनपाल संदीप वाघ, गोपाल बिरसोने, वनरक्षक बालाजी जाधव, सूरज शेळके, सुनीता लोणे, देवराव दिपके, तुषार भालेराव,शाहू भालेराव यांची उपस्थिती होती यावेळी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत वृक्षारोपण केले.वन महोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांनीही आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# विविध मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**




शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाच्यावतीने शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर गुरूवारी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन शिक्षणाधिकारी भागवत यांना देण्यात आले.

राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिक धोरणांमुळे राज्यातील शालेय शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला आहे. वीस ते बावीस वर्षापासून हजारो शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन किंवा अंशत: वेतनावर राबवून घेतले जात आहेत. अशैक्षणिक कामांमुळे शिक्षणावर परिणाम होत आहे. या विरोधात तसेच विविध मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाच्यावतीने भरपावसात दुपारी ४ ते ६ या वेळात शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत शिक्षणाधिकारी भागवत यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करावी, निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलीत अनुदान सुत्रानुसार १०० टक्के अनुदान द्यावे, आरटीई कायद्याची अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी सक्ती रद्द करावी, पदोन्नतीस टीईटी अट रद्द करावी, शिक्षकांची बीएलओ कामातून सुटका करावी, कर्मचाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, शिक्षकांची रिक्त पदे भरावीत, शिक्षकेत्तर पद भरतीवरील बंदी तत्काळ उठवावी, पाल्यांना मोफत शिक्षणाचा आदेश लागू करावा आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी एच के भडके, एन टी सोळंके, टी जी पवार, बी ए वऱ्हाड, एच डी पठाडे, आर डी देशमुख, ए वाय शेख, पी पी शिंदे, आर एम डोल्हारे, जी एस कऱ्हाळे आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- शहरातील गड्डीपीर गल्लीतील सुप्रसिध्द नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात संकष्ट चतुर्थी निमित्त शहरासह बाहेर गावाहून येणाऱ्या भाविकांनी दर्शनासाठी सकाळपासून रांगा लावल्या होत्या. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### वन्यजीव प्रेमींचा वन विभागाकडून सत्कार



हिंगोली- येथील विभागीय वन अधिकारी, वनविभाग हिंगोली येथे संग्राम भालेराव वन्यजीव प्रेमी/रक्षक, लक्ष्मण राऊत, सुरेश सावंत यांना छत्रपती संभाजी नगर येथील प्रादेशिक वनसंरक्षक प्रमोद चंदलाकरा यांचे हस्ते वन्यजीव रक्षक म्हणुन उत्कृष्ट कामे केल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वनविभागाचे विभागीय वनाधिकारी डॉ.राजेंद्र नाळे, सहाय्यक वनसंरक्षक सचिन माने, वनपरिक्षेत्र अधिकारी आर.एल.पाटील,एच.एन.जाधवर, एम.एस.केंद्रे, व्ही.बी.टाक, श्रीमती एल.एम.पवार, नागरगोजे तसेच कार्यालयीन व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### गजानन महाराज दिंडीला चोख पोलिस बंदोबस्त



हिंगोली- श्रीक्षेत्र संत गजानन महाराज यांच्या पालखीचा गुरूवारी दिग्रस कऱ्हाळे येथे मुक्काम होता. शुक्रवारी सकाळी ही दिंडी औंढा नागनाथकडे रवाना झाली. हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांच्यासह ग्रामीण पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी यांनी कालपासून दिंडीला संरक्षण देण्यासाठी जागोजागी चोख पोलिस बंदोबस्त लावला होता. शुक्रवारी सकाळी दिंडीचे प्रस्थान औंढा नागनाथकडे झाले असता या दिंडीला पोनि विष्णुकांत गुठ्ठे यांच्यासह पोलिसांनी बंदोबस्त दिल्याचे दिसत होते.

### गोरेगाव येथील तरूणाचे उपोषण

हिंगोली- गोरेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या खोल्यांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे सदरील बांधकाम किती दिवस टिकेल याची शाश्वती नाही. याबाबत तक्रार करूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही. या कामांची तपासणी करण्यात यावी तसेच सदरील कामांवर बाल कामगारांचा वापर होत आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदार आणि अभियंता यांची सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावेत या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष बंडू देवडे, विद्यार्थी सेना उपाध्यक्ष संदीप जाधव यांनी येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर दि १ जुलैपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

# डिग्रस कऱ्हाळे येथे १५ क्विंटलच्या पोळ्या आणि ८ क्विंटल बुंदीचा महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**

शेगाव येथील श्रीक्षेत्र संत गजानन महाराज यांची दिंडी गुरूवार दि २ जुलै रोजी हिंगोली तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथे मुक्कामी होती. मागील ५७ वर्षाची परंपरा कायम राखत डिग्रस कऱ्हाळे ग्रामस्थांनी दिंडीचे जंगी स्वागत केले. तसेच यावेळी सुमारे २२ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी १५ क्विंटल पोळ्या आणि ८ क्विंटल बुंदीचा महाप्रसाद तसेच ५ क्विंटल भाजी करण्यात आली होती.

श्रीक्षेत्र शेगाव येथील संत गजानन महाराज यांची पायी दिंडी सोहळा डिग्रस कऱ्हाळे गावासाठी उत्साहाची पर्वणीच असते. या सोहळ्याच्या स्वागतासाठी आकर्षक रांगोळ्या काढल्या जातात. या शिवाय टाळ, मृदंगाच्या गजरात दिंडीचे स्वागत केले जाते. विशेष म्हणजे यावेळी आयोजित महाप्रसादाची सेवा सर्वच गावकऱ्यांना मिळावी यासाठी जमा झालेले गव्हाचे पीठ सर्व घरांमध्ये वाटप करून त्याच्या पोळ्या तयार करून आणल्या जातात.

दरम्यान गुरूवारी सात वाजता संत गजानन महाराज यांच्या दिंडीचे डिग्रस कऱ्हाळे येथील कमानीजवळ जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर टाळ व मृदंगाच्या गजर करीत दिंडीचा गावात प्रवेश झाला. यावेळी सर्वच गावकऱ्यांनी तसेच उपस्थित भाविकांनी दिंडीचे स्वागत केले. दिंडीचा गावात प्रवेश झाल्यानंतर महाआरतीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी डिग्रस कऱ्हाळे सह परिसरातील गावकरी महाप्रसाद घेण्यासाठी हजर होते. रात्री उशिरापर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम चालला. यावेळी तब्बल २२ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गावातील सुमारे २ हजारपेक्षा जास्त स्वयंसेवकांनी महाप्रसादाचे वाटप केले.

संत गजानन महाराज पालखीचे दर्शन घेण्यासाठी हिंगोली शहरासह परिसरातील भाविकांनी डिग्रस कऱ्हाळे येथे मोठी गर्दी केली होती. संत गजानन महाराज पालखीच्या दर्शनासाठी ठिकठिकाणी भाविक जमा झाल्याचे पहायला मिळाले. यावेळी हिंगोली ते औंढा नागनाथ रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसत होत्या. त्यामुळे काही काळ या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी झाली होती.

# औंढा नागनाथ मंदिर परिसरात एफडीएची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**



आठवे ज्योर्तिलिंग औंढा नागनाथ येथे मंदिराच्या परिसरात उघड्यावर पेढा विक्री करणाऱ्या ७ दुकानांवर अन्न व औषध प्रशासनाने छापे टाकून तब्बल १ क्विंटल पेढा जप्त करून नष्ट केला आहे. या कारवाईमुळे औंढ्यात एकच खळबळ उडाली आहे.

श्री नागनाथाच्या दर्शनासाठी औंढा नागनाथ येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. याशिवाय महाशिवरात्री, श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी होते. या दरम्यान भाविक औंढा नागनाथ येथील प्रसिध्द असलेला पेढा मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात.

मागील काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशसानाच्या अधिकाऱ्यांनी हिंगोली व परभणी जिल्ह्यात गुटखा, तंबाखू विक्रीच्या दुकानांवर छापे टाकून कारवाईचे सत्र सुरू केले आहे. याशिवाय मिठाई विक्रीची दुकाने तसेच काही किराणा दुकानावरही छापे टाकून खाद्य पदार्थांचे नमुने तपासणीसाठी धेतले जात आहेत. त्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त पी एम खताळ यांच्यासह निरीक्षक तुषार घोपे, राजश्री सावंत यांच्या पथकाने औंढा नागनाथ मंदिराच्या बाजूला असलेल्या मिठाई विक्रीच्या दुकानांवर तपासणी सुरू केली. यामध्ये अधिकाऱ्यांच्या पथकाने सात दुकानांमध्ये तपासणी केली असता त्या ठिकाणी पेढा उघड्यावर ठेवण्यात आल्याचे दिसून आले. याशिवाय पेढा कोठून आणला, त्याच्या पावत्या कुठे आहेत याची माहीती दुकानदारांना देता आली नाही. त्यामुळे या सात दुकानांमधून १ क्विंटल पेढा जप्त केला आहे. सदर पेढा नष्ट करण्यात आला आहे.

# अंगणवाडी सेविकांना सहाय्यक बीएलओची कामे न देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**



ग्रामीण भागात निवडणुक विभागाने अंगणवाडी सेविकांना सहाय्यक बीएलओची कामे दिली आहेत. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होण्याची शक्यता असून ही सहाय्यक बीएलओची कामे देऊ नयेत अशी मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे अंगणवाडी सेविकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामीण भागात केंद्र व राज्य सरकारच्या अनेक कामांमध्ये अंगणवाडी सेविका काम करीत आहेत. शिवाय मानधन तत्वावर ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती व स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार पुरवणे, आरोग्य तपासणी, लसीकरकण, बालकांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी अशी कामे पार पाडावी लागतात.

अंगणवाडी सेविकांना इतर खातेबाह्य कामे दिल्यास मुळ कामात खंड पडून लाभार्थ्यांवर विपरीत परिणाम होवू शकतो. तसेच खातेबाह्य बैठकींना अंगणवाडी सेविकांना बोलावले जात आहे. यापुढे अंगणवाडी सेविका अशा खातेबाह्य बैठकीला हजर राहणार नाहीत तसेच या कामांवर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेली सहाय्यक बीएलओची कामे मागे घ्यावीत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# संत गजानन महाराज पालखीचे औंढा नागनाथ नगरीत स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जुलै**



शेगाव येथील श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे शुक्रवारी (ता.०३) जुलै रोजी सकाळी अकराच्या सुमारास औंढा नागनाथ शहरात आगमन झाले. ज्ञानबा-तुकारामचा जयघोष अन् टाळ-मृदंगाच्या गजराने औंढा नागनाथ नगरी दुमदुमून गेली होती.

सकाळी अकराच्या सुमारास श्री संत गजानन महाराज पालखी सोहळा शहरात दाखल झाला. पालखी मार्गासह घराघरांसमोर आकर्षक रांगोळ्या काढून दिंडीचे जंगी स्वागत करण्यात आले. आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ मंदिरामध्ये पालखीचे आगमन झाले. देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांनी पालखीचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा केली. वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड आदींची उपस्थिती होती. दुपारच्या जेवणानंतर पालखी दुपारी दोनच्या सुमारास जवळा बाजारकडे रवाना झाली. यावेळी पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे सहाय्यक पोलिस निरीक्षक आयुब शेख, पोलिस उपनिरीक्षक अमोल इंगोले, पोलिस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, पोलिस उपनिरीक्षक शेख खूदुस, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक एस राठोड यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त तैनात केला होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आता ॲन्टी थेफ्ट पेट्रोलिंग पथक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुलै -**

चोरी, घरफोडी आदी गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी आता जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ॲन्टी थेफ्ट पेट्रोलिंग पथक स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रत्येक पथकामध्ये एक पोलीस अधिकारी व तीन पोलीस अंमलदार यांचा समावेश राहणार आहे. हि पथके दररोज नियमित गस्त घालणार असून, विशेषतः बसस्थानक, रेल्वेस्थानक, एटीएम, बँक, पेट्रोलपंप, व्यापारी संकुले, निर्जन भाग आदी ठिकाणावरुन विशेष लक्ष देण्यात येणार आहे. या पथकावर पोलीस नियंत्रण कक्षामार्फत देखरेख ठेवण्यात येणार असून, या उपक्रमामुळे गुन्ह्यांवर आळा बसेल, असा विश्वास जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी व्यक्त केला.



**लिंबगाव हद्दीतून चोरलेली गेलेली बॅग हस्तगत**

लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जवळपास ७ लाख रुपये असलेली बॅग आरोपींनी जबरदस्तीने हिसकावून नेली होती. ती बॅग स्थानिक गुन्हे शाखा आणि लिंबगाव पोलिसांनी संयुक्त कारवाई करत हस्तगत केली असून, सहा लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांना मिळालेल्या माहितीवरुन अक्षय चंद्रकांत कुलथे रा.झेंडा चौक वसमत, साहिल ओंकार केजकर रा.नांदेड, गोपाल विवेक रापतवार रा.वसमत व एका अल्पवयीन बालकास ताब्यात घेतले. या आरोपींची चौकशी केली असता आरोपी अक्षय कुलथे याने त्याचा साथीदार गोपाल रापतवार यास एक लाख रुपये देण्याचे कबूल केले होते. यामुळे या आरोपींनी कट रचून दि.२९ जून रोजी लिंबगाव परिसरात फिर्यादीस चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडील सहा लाख ८१ हजार रुपये असलेली बॅग हिसकावून नेली होती. पोलिसांनी या चारही आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल, गुन्ह्यात वापरलेली स्कुटी असा एकूण ७ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, पोहेकॉ.रविशंकर बामणे, रितेश कुलथे, चंद्रकांत स्वामी, अझरोद्दीन शेख, अनिल बिरादार तसेच लिंबगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक बोधनकर, पोलीस हवालदार रितेश टाक, प्रदीप गर्दनमरे, बालाजी तेलंग यांच्या पथकाने केली.

# बारड येथील दांपत्याचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३ जुलै -**



समाजाकडून आयुष्यभर मिळालेल्या ऋणाची परतफेड मृत्यूनंतरही करता यावी, या उदात्त भावनेतून बारड येथील शिक्षिका प्रणिता श्रीनिवास देशमुख आणि त्यांचे पती श्रीनिवास पंडितराव देशमुख यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

विशेष म्हणजे, आज २६ रोजी स्वतःच्या विवाह वर्धापन दिनाचे औचित्य साधत या दांपत्याने डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे मरणोत्तर देहदानासाठी अधिकृत अर्ज भरून आपल्या संकल्पाची नोंद केली.

प्रणिता देशमुख या शनी (पार्डी) येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. तर त्यांचे पती श्रीनिवास देशमुख हे व्यावसायिक आहेत. त्यांना दोन मुली असून संपूर्ण कुटुंबाने या निर्णयाला पाठिंबा दिला आहे.

मृत्यूनंतरही आपला देह वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि मानवसेवेसाठी उपयोगी पडावा, या विचारातून त्यांनी हा निर्णय घेतला. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शरीररचनाशास्त्राच्या अभ्यासासाठी देहदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अशा देहदानामुळे भावी डॉक्टरांना प्रत्यक्ष अध्ययनाची संधी मिळते आणि वैद्यकीय संशोधनालाही मोठी मदत होते.

आजच्या भौतिकवादी युगात स्वतःच्या आनंदापलीकडे जाऊन समाजहिताचा विचार करणारे लोक दुर्मिळ होत चालले आहेत. अशा परिस्थितीत देशमुख दांपत्याचा हा निर्णय केवळ वैयक्तिक संकल्प नसून समाजाला दिलेला एक मौल्यवान संदेश आहे. विवाह वर्धापन दिन साजरा करण्याची ही अनोखी आणि समाजोपयोगी पद्धत अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

माणूस मृत्यूनंतरही आपल्या कृतीतून जिवंत राहू शकतो. आपला देह दुसऱ्यांच्या ज्ञानासाठी, संशोधनासाठी आणि मानवकल्याणासाठी उपयोगी पडणार असेल, तर त्यापेक्षा मोठे दान कोणते? असा संदेश देशमुख दांपत्याच्या या निर्णयातून समाजापुढे आला आहे. देशमुख दांपत्याच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानासारख्या चळवळींमध्ये सहभागी व्हावे, अशी अपेक्षा देशमुख दांपत्यामी यावेळी व्यक्त केली आहे.

**शिक्षिकेची समाजाला प्रेरणा**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका प्रणिता श्रीनिवास देशमुख यांनी ज्ञानदानाबरोबरच मानवसेवेचाही आदर्श घालून दिला. विवाह वर्धापन दिनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून त्यांनी सेवा हीच जीवनाची खरी सार्थकता हा संदेश समाजापुढे ठेवला.



## हिमायतनगर पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई

**हिमायतनगर-** पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकी विरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत हिमायतनगर पोलीसांनी सलग दोन प्रभावी कारवाया करून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा जप्त केले आहेत.पहिल्या कारवाईत मौजे सोनारी येथील टोलनाका येथे रात्री ०१.०० वाजण्याच्या सुमारास विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा क्रमांक MH-२६-BL-८०६१ पकडण्यात आला. या प्रकरणी चालक बाबुराव गणपती कोठुळे व वाहन मालक विनायक हनुमंतराव हजापुरे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच गौण खनिज अधिनियम कलम ४ व २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत गुन्हा मौजे पोटा (बु.) बसस्थानक परिसरात सकाळी ०५.२० वाजण्याच्या सुमारास विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा क्रमांक चक-२६-ऊ-२२१४ जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक विजय गोविंद जाधव व वाहन मालक राजेश्वर काशिनाथ राचेवाड यांच्याविरुद्ध त्याच कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कारवायांमध्ये मिळून दोन हायवा वाहने (प्रत्येकी १५ लाख) व अंदाजे ८ ब्रास वाळू (३२ हजार) असा एकूण ३० लाख ३२,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि शेख व पोह नागरगोजे यांनी केली आहे.

## माजी विद्यार्थ्यांकडून दिवंगत मित्राच्या कुटुंबाला मायेचा आधार

**तभा वृतसेवा**
**बिलोली दि. ३ जुलै -**

श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्यु. कॉलेज, शारदानगर सगरोली येथील १० वी (१९९९) व १२ वी (२००१) बॅचच्या मस्ती का पाठशाला व ओढ मैत्री मित्र परिवार यांनी मैत्रीचे नाते जपत दिवंगत मित्र किरण गायकवाड यांच्या कन्येच्या विवाहप्रसंगी त्यांच्या कुटुंबाला मायेचा आधार दिला.



विवाह सोहळ्यादरम्यान मित्र परिवारातील सदस्यांनी एकत्र उपस्थित राहून दिवंगत किरण गायकवाड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन मैत्रीचे ऋण जपत आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यावेळी उपस्थित मित्रांनी, मित्र आज आपल्यात नसला तरी त्याचे कुटुंब हेच आपले कुटुंब आहे. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी मैत्री आहे, अशी भावना व्यक्त केली. श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्यु. कॉलेज, शारदानगर सगरोली येथील १० वी (१९९९) व १२ वी (२००१) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी जपलेली ही मैत्री, एकजूट आणि सामाजिक बांधिलकी समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श ठरत असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## पुस्तकावर बोलू काही... पाऊस... कविता आणि विद्रोहाचा जागर !

**नांदेड, दि. ३ जुलै -** नांदेड- सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र (नोंदणीकृत) शाखा नांदेडच्या वतीने ५ जुलै २०२६ रोज रविवार सकाळी ठिक ११.१५ वाजता हॉटेल विसावा येथे पुस्तकावर बोलू काही... आणि पाऊस... कविता... आणि विद्रोह या विशेष नवोपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून; सदर उपक्रमांतर्गत मारोती भुजंगराव कदम लिखित 'मास्तर आवगो रे...' या बालकथासंग्रहावर विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. भाष्यकार म्हणून प्रा. गोविंद बैलके, सेवानिवृत मुख्याध्यापक बालाजी थोटवे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. संतोष सेलूकर, सुरेखा महादसवाड यांचा सहभाग असून सदर चर्चासत्र डॉ. बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक बापूसाहेब गजभारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. दुपारच्या सत्रात पाऊस... कविता आणि विद्रोह... या विशेष काव्यपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले असून, काव्यपौणिमेच्या... कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी विद्रोही कवी अँड. संजय भारदे राहणार असून निमंत्रित कवी म्हणून आत्तम गेंदे, यशवंत मस्के, अशोक कुबडे, आ.ग. ढवळे, प्रकाश ढवळे, थोरात बंधू, रुपाली वागरे- वैद्य, भाग्यश्री आसोरे, केशव पाटील, मारुती डोईफोडे आदी कवींची हजेरी राहणार असल्याचे संयोजन समिती प्रमुख अनुरत्न वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हणटले आहे. नागोराव डोंगरे, कैलास धुतराज, शंकर गच्चे, रणजित गोणारकर, प्रा. प्रल्हाद इंगोले, बाबूराव पाईकराव यांनी कार्यक्रमाकरिता पुढाकार घेतला आहे.

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट

**हिमायतनगर -** तालुक्यातील तब्बल ८७ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने भारतीय स्टेट बँकेच्या स्थानिक शाखेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पंचायत समितीकडून वेतनाचा धनादेश वेळेत जमा करूनही अनेक दिवस उलटून गेले, तरी कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगार जमा न झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पंचायत समितीने दिनांक २४ जून रोजी सुमारे ७ लाख ६९ हजार रुपयांचा धनादेश बँकेत जमा केला. मात्र, अनेक दिवस उलटूनही वेतन खात्यात न आल्याने कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरखर्च, कर्जाचे हप्ते आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची कोंडी झाली आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन खात्यात जमा करून संबंधित एस बी आय बँक कर्मचाऱ्यांची प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली.

## विद्यापीठाच्या ध्वजातील निळा रंग हटवला!

**नांदेड -**नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने आपल्या ध्वजातील निळा रंग गायब केला असून यासाठी महामहीम राज्यपाल अर्थात विद्यापीठाचे कुलपती यांची कसलीच परवानगी घेतली नाही. शिवाय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत देखील कसलाही ठराव घेण्यात आलेला नाही, असे असताना जातीय मानसिकतेतून ध्वजातून निळा रंग हटविण्यात आला असल्याचा आरोप अन्याय प्रतिकार दलाचे संस्थापक कार्याध्यक्ष तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तलवारे यांनी केला असून, ध्वजातील निळ्या रंगाचा पट्टा पूर्ववत ठेवावा या मागणीसाठी ते मागील २ वर्षापासून लढा देत आहेत. विद्यापीठाने आत्तापर्यंत फक्त एक समिती नेमली आहे व हा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे.

## नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी विविध विभागांना दिल्या भेटी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुलै -**

नांदेड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी आज जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार तसेच संबंधित विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.



मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, लेखा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, शिक्षण विभाग आदी विभागांना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली.

यावेळी त्यांनी कार्यालयीन स्वच्छतेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. प्रत्येक कार्यालय स्वच्छ, नीटनेटके व लोकाभिमुख असावे. तसेच कार्यालयीन परिसराची नियमित स्वच्छता राखावी, असे निर्देश त्यांनी दिले. विविध कामांसाठी जिल्हा परिषदेत येणाऱ्या नागरिकांची कामे वेळेत व सुलभपणे मार्गी लावावीत. नागरिकांना कोणताही अनावश्यक त्रास होणार नाही, याची विभागप्रमुखांनी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून विभागांच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. कार्यक्षम, पारदर्शक आणि लोककेंद्रित प्रशासनासाठी सर्वांनी समन्वयाने काम करत नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# नांदेड दक्षिणच्या विकासासाठी भरीव निधी द्या: आ. आनंदराव पाटील बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ जुलै -**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शहरासह ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार आनंदराव पाटील तिडके-बोंढारकर यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केली.



पावसाळी अधिवेशनात आमदार बोंढारकर यांनी मतदारसंघातील विविध विकासकामांसह रोजगार हमी योजनेशी संबंधित अनेक प्रश्न सभागृहात उपस्थित केले. रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत रोजगार सेवकांच्या मानधनवाढीचा मुद्दा त्यांनी ठळकपणे मांडला. तसेच कुशल व अकुशल कामगारांच्या निधीचे वितरण तातडीने सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. या प्रश्नांवर उत्तर देताना रोजगार हमी योजनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सकारात्मक भूमिका घेत, योजनेशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही सभागृहात दिली.

यावेळी आमदार बोंढारकर यांनी नांदेड शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार अपुऱ्या पडणाऱ्या मूलभूत सुविधांकडे सरकारचे लक्ष वेधले. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, नागरी सुविधा आणि ग्रामीण भागातील विकासकामांसाठी तातडीने विशेष निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण कायापालट करण्यासाठी आवश्यक निधी तातडीने मंजूर करून विकासकामांना गती द्यावी, अशी जोरदार मागणी त्यांनी सभागृहात केली.

# नांदेडमध्ये शालेय पोषण आहाराची तपासणी

## दोन शाळांमधून सुमारे २ लाख ३४ हजाराचा अन्नसाठा जप्त, नमुने विश्लेषणासाठी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुलै -**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार २ जुलै २०२६ रोजी नांदेड येथे शालेय पोषण आहाराची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे यांनी सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी व्ही. एस. लोंढे, अरुण तम्मडवार, अमृता दुधाटे आणि अ. नं. गिरी यांच्या पथकासह दोन शाळांमधील पोषण आहार विभागाची तपासणी करून विविध अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेतले.

बाबानगर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात रिफाइंड सोयाबीन तेल, सोया वडी, तांदूळ आणि तूर डाळ यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच सोया वडी या अन्न पदार्थाचा उर्वरित साठा (३९८ किलो), तांदूळ (२,९९८ किलो) आणि तूर डाळ (९९८ किलो) असा एकूण २ लाख २४ हजार ५३० रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला.

यानंतर वसंतनगर येथील राजर्षी शाहू विद्यालयात सोया वडी, तांदूळ आणि मूग डाळ यांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. येथे उर्वरित ९८ किलो सोया वडीचा ९ हजार ८०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

प्रयोगशाळेतील विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

ही कारवाई सहायक आयुक्त सु. द. जिंतुरकर तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

## आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करा : जिल्हाधिकारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुलै -**

महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहिर केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

# शेतीपंपासाठी जास्त वेळ विजपुरवठा व्हावा ; विधानसभेत आ.अंतापूरकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जुलै -**

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या ढिसाळ, नियोजनशून्य आणि निष्काळजी कारभाराचा प्रश्न आमदारांनी विधानसभेत उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, नादुरुस्त डी.पी. वेळेत न बदलणे, पाणीपुरवठा योजना ठप्प होणे, शेतकऱ्यांना अपुरा वीजपुरवठा तसेच लोकप्रतिनिधींना त्रास दिला जात असल्याच्या गंभीर बाबी सभागृहात मांडत आ.अंतापूरकर यांनी विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

आ.अंतापूरकरांनी सभागृहात सांगितले की, भर पावसाळ्यातही मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अनेक दिवस वीजपुरवठा खंडित राहत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. बिलोली तालुक्यातील किनाळा गावात सलग तीन दिवस संपूर्ण गाव अंधारात असल्याचा उल्लेख करत, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतरही नवीन डी.पी. उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मतदारसंघातील अनेक ठिकाणी नादुरुस्त डी.पी. दुरुस्त करण्यास ट्रान्सफॉर्मर ऑईल, किटकॅट व इतर साहित्य उपलब्ध नसल्याचे कारण देत विलंब केला जात असल्यामुळे अनेक गावे दिवसानुदिवस अंधारात राहत



असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. गावठाणातील डी.पी.च्या कमतरतेमुळे ग्रामीण पाणीपुरवठा योजनाही ठप्प पडत असून नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महावितरणचे काही अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आ.अंतापूरकरांनी केले दरम्यान जनतेच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करणाऱ्या एका सरपंचावर संबंधित अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकरणात वारंवार तक्रारी करूनही संबंधित सरपंचाला न्याय मिळालेला नसल्याने लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधताना आ.अंतापूरकरांनी अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे शेतकरी सिंचनावर अवलंबून आहेत. मात्र शेतीपंपांना केवळ सहा तास वीजपुरवठा केला जात असून त्या कालावधीतही वारंवार वीज खंडित होत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. त्यामुळे बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला असल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या कारभाराची ढिसाळ नियोजनाचा कारभार चव्ह्याट्यावर आनताना नादुरुस्त डी. पी. तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, सर्व दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत, आवश्यक साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, गावठाण व पाणीपुरवठा योजनांना अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करावा, शेतीपंपांसाठी वीजपुरवठ्याचे तास वाढवून नियमित वीज उपलब्ध करून द्यावी, संबंधित सरपंचावरील खोट्या गुन्ह्याची निष्पक्ष चौकशी करून त्यांना न्याय द्यावा तसेच निष्काळजी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी आमदारांनी शासनाकडे सभागृहातून केली.

# पाडळी येथे कृषी दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि ३ जुलै :** कृषी विभाग तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ सलग्न छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कृषी महाविद्यालय कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर येथील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्नता कार्यक्रम या अंतर्गत पाडळी ता पैठण येथे वृक्षारोपण व वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून महाराष्ट्र कृषी दिन साजरा करण्यात आला .

हा कार्यक्रम पाडळी ग्रामपंचायत येथे करण्यात आला. यावेळी सरपंच . लीलाबाई पवार , माजी उपसरपंच चंद्रकांत हुड, उपसरपंच दत्तात्रय बांडे ,पोलीस पाटील कृष्णा दिसागज, सहाय्यक कृषी अधिकारी मोहन जाधव प्रगतशील शेतकरी राजू हुड , प्रताप हुड , प्रकाश हुड , जि. प. शिक्षिका वर्षा नवरात , कृषी सखी कृषी ताई तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका प्रणिता कटारे यांनी कृषी दिन निम्मित वृक्षारोपणाचे महत्त्व सांगून वृक्षारोपण करण्यात आले कृषी दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले , EL-निनो संदर्भात आंतरपीक पद्धती ,सेंद्रिय शेती जमिनीची पाणी पातळी कशी वाढवावी याबद्दल कृषी विभागाकडून मार्गदर्शन करण्यात आले .छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन पाटील व उपप्राचार्य डॉ. अतुल भोंडवे महाविद्यालयाचे प्राध्यापिका प्रणिता कटारे व कार्यक्रम समन्वयक राजूसिंग डोंगर जाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. गावाला लाभलेले कृषी दूत विवेक बनजगोळे, वेदांत हिंगमिरे ,श्रीनिवास शिंदे ,स्वराज नांदेडे, सलोनी कावरे ,चंचल कोकाटे, तन्वी साठे, प्राची मंगलपवार, वैष्णवी राठोड ,वैष्णवी गुडला, मनीषा मोरे, अनुजा मावची , श्रुती मगर ,ऋतुजा सांगळे हे Csmss कृषी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले

# खुलताबाद नगर परिषदेचे लेखापाल जय किशन दळवी यांची फुलंब्री येथे बदली



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद नगर परिषदेचे लेखपाल जय किशन दळवी यांचे नुकतीच फुलंब्री नगर पंचायत येथे बदली झाल्यामुळे खुलताबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर शेख कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे व सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार व मानचिन्ह देऊन गौरव करून निरोप देण्यात आला

खुलताबाद नगरपरिषद येथून आपल्या शासकीय सेवेची लेक पाल या पदाची सुरुवात करून प्रामाणिकपणाने आपली जबाबदारी पार पाडणारे लेखापाल जय किशन दळवी यांच्या बदलीच्या निमित्ताने सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने निरोप समारंभा च्या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना कर्मचाऱ्यांनी आपल्या शासकीय सेवेत आपल्या कामाशी जबाबदारीशी एकनिष्ठ असले पाहिजे अशी भावना आपल्या मनोगतातून शेख समीर मुख्याधिकारी नगरपरिषद खुलताबाद यांनी व्यक्त केली.

# स्कोडा ऑटो इंडियाची पहिल्या सहामाहीत विक्रमी विक्री; 38,894 वाहनांची नोंद



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** स्कोडा ऑटो इंडियाने २०२६ च्या पहिल्या सहामाहीत ३८,८९४ वाहनांची विक्री नोंदवत सलग दुसऱ्या वर्षी सहामाही विक्रीचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ही विक्री २०२५ च्या याच कालावधीच्या तुलनेत ७.५ टक्क्यांनी अधिक असून, भारतातील कंपनीच्या वाढत्या लोकप्रियतेची साक्ष देणारी ठरली आहे. २०२५ मध्ये स्कोडा ऑटो इंडियाने आपल्या २५ वर्षांच्या इतिहासातील सर्वोच्च सहामाही विक्रीची नोंद केली होती. त्यानंतर २०२६ मध्येही कंपनीने ती कामगिरी मागे टाकत विक्रीत आणखी वाढ साधली आहे. ग्राहक-केंद्रित उपक्रम, दर्जेदार उत्पादने आणि उत्कृष्ट सेवेमुळे ब्रँडवरील ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे कंपनीने म्हटले आहे. स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता यांनी सांगितले की, नवीन कुशाक, अद्ययावत कोडियाक आणि सर्वस्वी नवीन कोडियाक आरएस या मॉडेल्सना ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मुलानी वाडगाव येथे उसाच्या शेतात गांजाची लागवड उघड; 31 किलो गांजाची झाडे जप्त, एकास अटक

तभा वृत्तसेवा

**बिडकीन | दि. ३ जुलै :** पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुलानी वाडगाव येथे उसाच्या शेतात गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, बिडकीन पोलिसांनी धाड टाकून सुमारे ३१ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली आहेत. या प्रकरणी शेतमालकास अटक करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुलानी वाडगाव येथील सुभाष आण्णा औटे (वय ६०) यांनी त्यांच्या मालकीच्या शेतात गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांना माहिती देऊन तत्काळ कारवाईचे नियोजन केले.



यानंतर सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, बीट जमादार योगेश नाडे, पोलीस कर्मचारी मगर, संजय चव्हाण, वाल्मीक निकम, वाघमोडे, स्वप्नील दिलवाले व इतर पोलिसांच्या पथकाने मुलानी वाडगाव येथील गट क्रमांक ५२ मधील शेताची पाहणी केली. यावेळी उसाच्या पिकामध्ये गांजाची झाडे लावल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ३१ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली. पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे बाजारभाव किंमत ३ लाख १० हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी शेतमालक सुभाष आण्णा औटे याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (NDPS Act) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या फिर्यादीवरून बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील व सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सिंग आणि बीट जमादार योगेश नाडे करीत आहेत.

# कबीरांच्या वाणीने एमजीएममध्ये रसिक मंत्रमुग्ध

**छत्रपती संभाजीनगर :** संत कबीर जयंतीनिमित्त महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'कहत कबीर' या गीतगायन कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रुक्मिणी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात संत कबीरांच्या "बुरा जो देखन मैं चला..." या कालातीत वाणीनं झाली आणि संपूर्ण सभागृह भक्तिरस व चिंतनशील वातावरणाने भारावून गेले.



कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कबीर मठाचे मठाधिपती महंत शांतीदास, अनुराधाताई कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्रा. संजय मोहोड, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, विभागप्रमुख राजू सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गायक राहुल खरे यांनी "गुरू बिन कौन बताये वाट", "माटी कहे कुंभार से", "मन लागो यार फकिरी में", "मौको कहाँ ढूंढे रे बंदे" यांसह संत कबीरांच्या अनेक लोकप्रिय रचना प्रभावी शैलीत सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या गायनाला सतीश जोगदंड, गौरव ढोले, कन्हैया लाटे, राहुल शिंदे आणि सचिन राठोड यांनी सुरेल साथ दिली.

यावेळी प्रा. संजय मोहोड यांनी संत कबीरांचे तत्त्वज्ञान प्रभावीपणे सादर करणे आव्हानात्मक असले, तरी राहुल खरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ते समर्थपणे साकारल्याचे सांगितले. राजू सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. संगीत, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम रसिकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेला.

# राज्य कर्करोग संस्थेत पेट-सीटी स्कॅन सेवेचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य कर्करोग संस्था अर्थात शासकीय कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक पेट-सीटी स्कॅन सेवा सुरू करण्यात आली असून, गुरुवारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते या सेवेचे लोकार्पण करण्यात आले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही सुविधा उपलब्ध झाल्याने छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यातील कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.



याप्रसंगी विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी पेट-सीटी स्कॅन सेवा सुरू करण्यामागील पाठपुरावा आणि संपूर्ण प्रवास उलगडून सांगितला. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी गरजू रुग्णांनी या अत्याधुनिक सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाला डॉ. अंजली वासडीकर, डॉ. अर्चना राठोड-पवार, डॉ. इशरत करीम, डॉ. प्रभाकर जिरवणकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दर्पण जक्कल यांच्यासह अनेक डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यापूर्वी पेट-सीटी स्कॅनसाठी रुग्णांना खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत असल्याने मोठा आर्थिक भार सहन करावा लागत होता. तसेच तपासणीसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने उपचारांनाही विलंब होत असे. आता ही सुविधा शासकीय रुग्णालयात उपलब्ध झाल्यामुळे कमी खर्चात आणि वेळेत तपासणी शक्य होणार आहे. यासाठी रुग्णालय परिसरातील जुन्या नेत्र रुग्णालयाच्या इमारतीत आवश्यक बदल करून आधुनिक केंद्र उभारण्यात आले आहे.

पेट-सीटी (पॉझिट्रॉन इमिशन टोमोग्राफी–कम्प्युटेड टोमोग्राफी) ही कर्करोगाच्या अचूक निदानासाठी अत्यंत महत्त्वाची तपासणी मानली जाते. या तपासणीद्वारे कर्करोगाचा प्रसार, उपचारांचा परिणाम आणि पुढील उपचाराची दिशा निश्चित करण्यास डॉक्टरांना मदत होते.

# नाट्यपंढरी सोयगाव नगरीमध्ये पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांचे भव्य स्वागत

तभा.वृत्तसेवा



**सोयगाव,दि.३ जुलै :** खान्देश-जळगाव येथून सद्गुरू झेंडूजी महाराज बेडीकर जळगाव जिल्ह्यातील यांची १९३ वर्षापासून सुरू असलेली पंढरीची पायी वारी दिंडी रामकृष्णहरी च्या जय घोषात सोयगाव नाट्य पंढरी येथे गुरुवार रोजी दाखल झाली. यावेळी समाज प्रबोधनकार विष्णू विनायकराव मापारी यांनी दिंडीचे स्वागत केले.सर्व वारकऱ्यासह हरिभक्त परायण गुरुवर्य भरत महाराज यांचे स्वागत केले.यावेळी रमेश रोकडे,आरोग्य दूत दिगंबर वाघ व हनुमान मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.दिंडी सोयगाव मुक्कामी असून उद्या दिंडीतील वारकऱ्यांची पावले पंढरीच्या दिशेने चालू लागतील.दिंडीमुळे सोयगावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# राष्ट्रीय जलतरण साक्षरता मिशनअंतर्गत राहुल टेकाळे यांची प्रमुख सल्लागारपदी नियुक्ती

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय जलतरण साक्षरता मिशनअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या जलतरण साक्षरता समिती, छत्रपती संभाजीनगरच्या कार्यकारिणीवर राहुल टेकाळे यांची प्रमुख सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष रविंद्र प्रभाकरराव निकम यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.



१५ जून रोजी साजऱ्या झालेल्या जागतिक जलतरण साक्षरता दिनानिमित्त झालेल्या समितीच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. जिल्ह्यात जलतरण साक्षरता चळवळ अधिक प्रभावीपणे राबविणे, पाण्यात बुडून होणारे मृत्यू रोखण्यासाठी जनजागृती करणे आणि सर्व वयोगटातील नागरिकांना जलतरणाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी समिती कार्यरत आहे.

"जल हे जीवन आहे, ते मृत्यूचे कारण ठरू नये" या ब्रीदवाक्यानुसार 'केजी ते पीजी' सर्वांना जलतरण साक्षर करण्याचे उद्दिष्ट समितीने ठेवले आहे. यासाठी विविध प्रशिक्षण उपक्रम, जनजागृती मोहीम आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

राहुल टेकाळे यांची सामाजिक बांधिलकी, विविध क्षेत्रांतील अनुभव आणि जलतरण साक्षरतेप्रती असलेली तळमळ लक्षात घेऊन त्यांची प्रमुख सल्लागारपदी निवड करण्यात आल्याचे अध्यक्ष रविंद्र प्रभाकरराव निकम यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हा शंभर टक्के जलतरण साक्षर करण्याच्या उद्दिष्टाला निश्चितच बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# आ. विलास बापू भुमरे यांचा वाढदिवसानिमित्य विविध उपक्रम

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०३ :-** पैठण तालुक्याचा बुलंद आवाज कार्यसम्राट आमदार विलास बापू भुमरे यांचा वाढदिवस पैठण तालुक्यासह जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार असून वाढदिवसाच्या दिवशी आमदार भुमरे हे जिल्हा बँकेच्या निवडणूक कामात व्यस्त राहणार आहेत.

दिनांक 4 जुलै शनिवार रोजी जिल्हा बँकेचे संचालक, शरद सहकारी साखर कारखाण्याचे चेअरमन आमदार विलास बापू भुमरे यांचा वाढदिवस असून या दिवशी हितचिंतक,कार्यकर्ते,पदाधिकारी यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून तसेच शाळेतील होतकरू विद्यार्थ्यांना मदत करून आपला वाढदिवस साजरा करावा. निवडणूक कामात व्यस्त असल्याने प्रत्यक्ष भेट टाळावी असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यासह पैठण तालुक्यात आमदार विलास बापू भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य दिव्य सामाजिक उपक्रम राबवून भावी मंत्री विलास बाप्पू भुमरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे.

# अवैध धंदे,वाळू तस्करी, गुटखा विक्री केल्यास कडक कारवाई : पो.नि.सलीम चाऊस

तसा वृत्तसेवा

**गंगापूर दि.३ :** गंगापूर शहरात अवैध वाळू वाहतूक व तस्करी , आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकला जाणारा अवैध गुटखा यामुळे शहरात अवैध धंदे बोकाळले होते पोलीस प्रशासन अन्न औषध प्रशासन महसूल प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असताना आमदार प्रशांत बंब यांनी स्वतः वाळू तस्करांच्या ठिकाणांवर छापे टाकून आणि गुटकाविक्रेत्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पावसाळी अधिवेशनात करण्यात आली या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी यावेळी महसूल मंत्री यांच्याकडे केली आहे त्यामुळे अवैध वाळू तस्कर आणि अवैध गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.

पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारताच नवे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी कायदा व सुव्यवस्थेबाबत कडक भूमिका घेतली आहे. शहरातील पानटपरी चालक, व्यापारी, बँकेचे अधिकारी आणि विविध व्यावसायिकांची बैठक घेऊन गुटखा विक्री, अस्वच्छता आणि



नियमभंग अजिबात खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

गंगापूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि इतर अवैध धंद्यांच्या मुद्द्यावर आमदार प्रशांत बंब यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आवाज उठवल्यानंतर पोलीस व महसूल प्रशासनात मोठ्या हालचाली सुरू झाल्या. त्यानंतर गंगापूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी सूत्रे हाती घेतली आहेत.

पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच बैठकीत पोलीस निरीक्षक चाऊस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "राज्यात गुटखा विक्रीवर बंदी आहे. कोणत्याही पानटपरीवर गुटखा विक्री आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल." तसेच पानटपऱ्या व व्यावसायिक आस्थापनांच्या परिसरात स्वच्छता राखणे बंधनकारक असून अस्वच्छता आढळल्यासही कारवाईचा इशारा त्यांनी दिला. बैठकीत व्यापाऱ्यांनी शहरातील वाहतूक कोंडी, सुरक्षेचे प्रश्न, अतिक्रमण आणि कायदा-सुव्यवस्थेसंदर्भातील विविध समस्या मांडल्या. त्यावर पोलिसांनी सकारात्मक भूमिका घेत व्यापाऱ्यांना नियमांचे पालन करण्याचे आणि पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. नव्या पोलीस निरीक्षकांच्या पहिल्याच बैठकीत दिलेल्या कडक इशाऱ्यामुळे शहरातील अवैध धंदे, गुटखा विक्री आणि नियमभंग करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून गंगापुरात कायदा-सुव्यवस्थेबाबत पोलीस प्रशासन अधिक आक्रमक होण्याचे संकेत मिळत आहेत.


## जाहिर समन्स

**मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा नंबर २६/ २०१८ प्रतिभा व ईतर विरुद्ध हिरामण व ईतर

नि.क्रं. 27/D

प्रती,
प्रतिवादी क्रं. ३,
चिंतामण हिरामण कोळी, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

ज्याअर्थी वादी नामे प्रतिभा चिंतामण कोळी (निकम) व ईतर २ यांनी तुमच्या विरुदध वाटपाकरीता मिळण्यासाठी या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यात तुम्हाला समन्स बजावणीसाठी पाठविले असता सदरचे समन्स न बजावता परत आल्याने तुमचे विरुदध जाहीर समन्सचा आदेश झालेला आहे. सबब तुम्हास या जाहीर समन्सदवारे कळविण्यात येते की, सदरच्या दाव्यात तुम्हास हजर होण्यासाठी तारीख 10/8/2026 ही ठेवण्यात आलेली आहे. तरी तुम्ही सदर तारखेस सकाळी ११:०० वाजता स्वतः अगर तुमच्या वतीने अधिकृतरित्या अधिकार दिलेल्या व्यक्ती किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहुन तुमचे म्हणणे सादर करावे. तुम्ही सदर तारखेस हजर राहुन तुमचे म्हणणे दाखल न केल्यास दाव्याची सुनावणी तुमचे अपरोक्ष होवुन निकाल दिला जाईल याची नोंद असुन दयावी.

करीता आजरोजी दिनांक 03/02/2026 रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2026/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-153 — दिनांक 08-06-2026

अर्जदार ०:- संतोष बन्सीलाल जाधव रा. नागद तांडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय नागद तांडा ता. कन्नड / ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ऍड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या यांचा मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा अरविंद संतोष जाधव चा जन्म दिनांक 12-02-2008 रोजी नागद तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा मुलगा चा जन्म दिनांक 12-02-2008 रोजी नागद तांडा ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अरविंद संतोष जाधव यांचा जन्म दिनांक 12-02-2008 रोजी नागद तांडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 15-07-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 12-02-2008 रोजी नागद तांडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../06/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. २४५/२०२५ — पढील तारीख १४/०८/२०२६

अर्जदार - १) एकनाथ भिवसन गवळी, वय ६८ वर्षे, धंदा शेती, रा. लोहगाव, पा. घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद २) पुंडलिक भिवसन गवळी मयत- यांचे वारस २-१) दत्तु पुंडलिक गवळी, वय ४३ वर्षे, धंदा- शेती, रा. लोहगाव, पा. घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद २-२) लिलाबाई पुंडलीक गवळी, वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोहगाव, पा. घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) नामदेव भिवसन गवळी, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. लोहगाव, पा. घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

अर्ज :- Bombay Regulation Act १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ आर. एम. नरोटे यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ व २-१ ते २-२ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे असुन भाऊ असुन अर्जदार क्र. २ पुंडलिक भिवसन गवळी हे देखील मयत झालेले आह, त्यांचे अर्जदार क्र. २-१ ते २-२ हे वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे भाऊ अर्जदार क्र. २-१ चे सख्खे काका व अर्जदार क्र. २-२ चे दिर मयत नामे रघुनाथ भिवसन गवळी हे होते ते अविवाहीत असतांनाच दिनांक २९/०१/२०१४ रोजी मौजे लोहगाव, पो. घाटशेंद्रा ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. २ नामे पुंडलिक भिवसन गवळी हे देखील सन १९९१ मध्ये मोजे लोहगाव येथे मयत झालेले आहे. त्यांचे अर्जदार क्र. २-१ ते २-२ हे वारस आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील, अर्जदार क्र. २-१ चे आजोबा व अर्जदार क्र. २-२ यांच्या सासरे नामे भिवसन बाळा गवळी हे देखील दिनांक २१/१०/१९९६ रोजी मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आई अर्जदार क्र. २-१ ची आजी व अर्जदार क्र. २-२ च्या सासु नामे लक्ष्मीबाई भिवसन गवळी हया पुर्वीच मयत झालेल्या आहे. मयतांचा अंत्यविधी मौजे लोहगाव ता. कन्नड येथे झालेला आहे. सोबत मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ३ व २-१ ते २-२ यांना मयत रघुनाथ भिवसन गवळी यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, करीता वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदार हे करीत आहे. अर्जदार हे गृप ग्रामपंचायत कार्यालय लोहगाव ता. कन्नड येथे दिनांक २२/०६/२०२६ रोजी वारस प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्र दिले नाही म्हणुन दिनांक २२/०६/२०२६ रोजी अर्जास कारण घडले आहे, अर्जदार क्र. १ ते ३ व २-१ ते २-२ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ३ व २-१ ते २-२ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल. सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक 29/6/26

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर-प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ-स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं ११०/ २०२६

अर्जदार :- १. राणीबाई भ्र. गोटु हरणे, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. मुंगसापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ह.मु. बोलठाण, ता. नांदगांव, जि. नाशिक २. वैष्णवी पि. गोटु हरणे उर्फे वैष्णवी भ्र. आबासाहेब बानगुडे, वय २१ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. गोळेगांव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. ३. संतोषी पि. गोटु हरणे, वय १४ वर्ष, धंदा शिक्षण, रा. मुंगसापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ह.मु. बोलठाण, ता. नांदगांव, जि. नाशिक (अ.पा.क. अर्जदार नं. १) ४. ज्ञानेश्वर पि. गोटु उर्फे गोटीराम हरणे, वय १५ वर्ष, धंदा शिक्षण, रा. तादुळवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ह.मु. बोलठाण, ता. नांदगांव, जि. नाशिक (अ.पा.क. अर्जदार नं. १)

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- अर्जदार नं. १ ते ४ हे मयत गोटु खंडू हरणे यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ चे पती व

अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील हे मयत गोटु खंडु हरणे हे होते व ते मौ. मुंगसापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पशा आजाराने दि. ८/२/२०२३ मध्ये मौ. मुंगसापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथे मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ४ हे असुन सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्याबाबत मृत्यु प्रमाण पत्र सोबत दाखल केले आहे..।

तसेच मयत गोटु खंडु हरणे यांचे वडील मयत खंडु हरणे हे २० वर्षा पुर्वी मयत झालेले आहेत व आई मयत परिगाबाई खंडु हरणे ही २०-२१ वर्षा पुर्वी मयत झालेली आहे. त्यांना सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच मयत गोटु खंडु हरणे यास कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ४ हे असुन सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत.

तसेच मयत गोटु खंडु हरणे यांचे अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्यामुळे सदर वारसांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदार नं. १ ते ४ हे वारस असल्याबाबतचे वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता आवश्यकता आहे.

करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ४ हे एकाच कुंटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ४ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उबर व आक्षेप न आल्यास मयत गोटु खंडु हरणे याचे अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि. १०/६/२०२६ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक. — सहाय्यक अध्यिक्षक

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. भार. एस. तापडिया, दुसरे सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्र- २३३/२०२६ पु. तारीख:०५/०८/२०२६

अर्जदार : १- सुनंदा पती सोमनाथ क्षिरसागर वय-५६, वर्षे, धंदा-घरकाम, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. (छ. संभाजीनगर) २- दिपककुमार पि. सोमनाथ क्षिरसागर वय-३८, वर्षे, धंदा-शैतमजुरी, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. (छ. संभाजीनगर) ३- मयुर पि. सोमनाथ क्षिरसागर वय-३६, वर्षे, धंदा-वाहनचालक, रा. चिखलठाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद. (छ. संभाजीनगर) ४- अर्जुन पि. सोमनाथ क्षिरसागर वय-२६, वर्षे, धंदा-व्यावसाय, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. (छ. संभाजीनगर)

गैरअर्जदार : निरंक

अर्ज - वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. [Bombay Regulation Act]

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र २ ते ३ चे वडील सोमनाथ नारायण क्षिरसागर हे दिनांक २८/१०/२०२५ रोजी मौजे चिखलठाण ता. कन्नड येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र. २ ते ४ ची आजी व मयताची जन्मादाती आई गयाबाई नारायण क्षिरसागर या देखील मौजे चिखलठाण ता. कन्नड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र.१ या मयत सोमनाथ नारायण क्षिरसागर यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत, अर्जासोबत ग्रामपंचायत कार्यालय मौजे चिखलठाण ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अर्जदार यांचे वडील मयत झाल्याने मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदारा व्यतिरिक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे.

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २१/८/२०२६ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक/१६/२०२६

आदेशावरुन

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्हि. डी. पाटील, दिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्र-२२२/२०२६

पु. तारीख: २८/०८/२०२६ 28/07/26.

अर्जदार : १-फकीरराव पि. देवराव सोनवणे वय-५१, वर्षे, धंदा- मजुरी, रा. घुसुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २- लिलाबाई भ्र. माणिक गायकवाड वय-४७, वर्षे, धंदा- मजरी, रा. चिखलठाण ता. कन्नड जि. औरंगाबाद ३- जयवंताबाई भ्र. सोमनाथ गायकवाड वय-५४, वर्षे, धंदा-मजुरी, रा. दाभाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४-कमलाबाई आसाराम मोरे (मयत तर्फे वारस) ४-१. राजु पि. आसाराम मोरे वय-५४, वर्षे, धंदा- मजुरी, रा. घुसुर, पो. हतनुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४-२. संगीता भ्र. भाऊसाहेब माळी वय-४९, वर्षे, धंदा- मजुरी, रा. दाभाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. [Bombay Regulation Act]

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. हे की, अर्जदार क्र. १ व ४-१ हे मौजे घुसुर ता. कन्नड येथील रहीवासी असुन अर्जदार क्र. २ हे मौजे चिखलठाण येथे राहतात व अर्जदार क्र. ३ व ४-२ हे मौजे दाभाडी येथे राहतात. अर्जदार क्र.१,२,३ ची आई येणुबाई भ्र. देवराव सोनवणे ही दिनांक-१९/०९/२०२४ रोजी मौजे घुसुर ता. कन्नड येथे वृध्दापकाळाने मयत झालेली आहे, तसेच अर्जदार क्र. १,२,३ ची बहीन व अर्जदार क्र.४-१ व ४-२ ची आई व मयत येणुबाई भ्र. देवराव सोनवणे यांची मोठी मुलगी नामे कमल आसाराम मोरे या देखील दिनांक-२०/०४/२०१७ मध्ये मौजे घुसुर येथे मयत झाल्या आहेत. या पुढे सर्व मयताच्या नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मयत असे संबोधले जाईल. अर्जासोबत ग्रामपंचायत कार्यालय मौजे घुसुर ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयतांच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या ग्रामपंचायत, महसुल दप्तरी नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला वारसाचे नावाची नोंद घेणेसाठी अर्जदारास वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व ईतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक १०/०८/२०२६

आदेशावरुन

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड